# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | ११ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १२३**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष आठवे / अंक ११ / नोव्हेंबर २००७

## संपादकीय


### "... आता काय परिस्थिती आहे?"

चोवीस तास चालविल्या जाणाऱ्या वृत्तवाहिन्या व या वृत्तवाहिन्यांची बातम्यांची भूक आज मितीस मानवी जीवनावर अत्यंत अनिष्ट परिणाम घडवून आणताना दिसत आहे. सातत्याने बातम्या ''घडवीत' रहायच्या, अपसामान्य किंवा विकृतीच्या जवळपास जाईल असे काही निर्माण करत रहायचे आणि शक्य असेल त्या भडक रंगात तितक्याच भडक पद्धतीने 'ब्रेकिंग न्यूज' या नावाखाली जनतेपर्यंत पोहचवीत रहायचे हा यांचा पोटापाण्याचा व्यवसाय असतो. या व्यवसायाचा समाजावर झालेला व होत असलेला महत्त्वाचा परिणाम म्हणजे जीवनाच्या प्रत्येक लहान मोठ्या, महत्त्वाच्या बिनमहत्त्वाच्या क्षेत्रांत निर्माण झालेली अस्थिरता आणि असुरक्षितपणाची भावना.

तुम्ही बघा असा आमचा आग्रह नाही, टी.व्ही. चे एक बटण तुमच्या हातात आहे असे शहाजोगपणे सांगणारी काही मंडळी असतात. समाज, समाज म्हणतात, तो सामान्य माणसांचा असतो व या माणसांचे वर्णन 'सामान्य' या विशेषणातून अचूक होते. टी.व्ही.च्या एका बटणाचे नियंत्रण आपल्या हातात आहे, हे समजत असूनही या बटणाचा वापर ही माणसे करू शकत नाहीत. म्हणूनच ती या विशेषणाला पात्र ठरतात. काही ना काही, कोठे ना कोठे घडत असतेच, किंवा घडवत ठेवलेले असते हे भांडवल वापरून चालवल्या जाणाऱ्या वाहिन्या मग या समाजासाठी काही परिमाणे, काही निकष नकळत तयार करतात. या नकळत तयार होणाऱ्या अपेक्षेबरहुकुम माणसे वागू पाहतात. तसे वागणे न जमल्यास त्यांची ओढाताण होते, घबराट निर्माण करण्याकडे त्यांचा कल वाढतो.

या अस्थिर वातावरणाचा परिणाम माणसाच्या मनावर होतो. मानसिक अस्वास्थ्याची परिणिती शारीरिक अस्वास्थ्यात होते. वास्तविक पाहता वृत्तवाहिन्या, त्यांतून प्रसारित केल्या जाणाऱ्या बातम्या या तारतम्याने घ्यावयाच्या असतात. हा विवेक समजत असूनही सुटतो व सामान्य म्हणविल्या जाणाऱ्या माणसांचे वर्तन अपसामान्य होऊ लागते. स्वजीवनाशी निगडित अनेक बाबींमध्ये या अस्थिरतेमुळे वादळे निर्माण होतात. आणि ही माणसे समाजविघातक कृत्ये करायला धजावतात.

(पृष्ठ क्रमांक ४०)



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक ११ / नोव्हेंबर २००७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक ५वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | अरुणाचलम् येथील रमण महर्षी | श्री. शंकरराव मठ | ३ |
| २) | श्रावणस्मृती- मातृदिन | सौ. मैत्रयी शेवडे | ७ |
| ३) | श्रावणस्मृती- निमित्त मंमळागौरीचे | सौ. शकुंतला सिंग | ९ |
| ४) | श्रावणस्मृती एक उपयुक्त पुस्तिका | प्रा. मोहन पाठक | १० |
| ५) | निसर्गरम्य केळवे | प्रा. अशोक ठाकूर | १२ |
| ६) | ज्ञानपीठ पुरस्कार : एक विचार | आशा भिडे | १५ |
| ७) | 'ग्रंथालयाकडून माझ्या अपेक्षा' | सौ. चंद्राणी माधव कुसेकर | १७ |
| ८) | साहित्य शोध | प्रा. आठले | २० |
| ९) | भारतीय संस्कृती - - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २१ |
| १०) | प्रश्नांचे बाण | प्रा. मोहन पाठक | ३१ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अरुणाचलम् येथील रमण महर्षी

*शंकरराव मठांच्या अव्याहत लेखन सत्रातील रमण महर्षी वरील लेखमालेस या अंकापासून सुरुवात करीत आहोत-संपादक*

## अरुणाचलम्

ही एक दीपस्तंभासारखी उभी असलेली टेकडी असून चेन्नईपासून अंदाजे दोनशे कि.मी. अंतरावर आहे. या टेकडीला विशेष महत्त्व प्राप्त झाल्याने हिला हिंदुस्थानातील, एक पवित्र ठिकाण मानण्यात येते. ही टेकडी म्हणजे एक तेजोलिंग असल्याची लोकांची धारणा आहे. ही टेकडी अरुणगिरी या सिद्ध योग्याचे वसतिस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. अरुणाचलम्‌ला दक्षिणेकडील कैलास असे म्हटले जाते. हा कैलास जास्त प्राचीन असावा. कारण ही टेकडी हिमालयाच्या उत्पत्तीपूर्वीपासून अस्तित्वात असावी, असे भूस्तर शास्त्रज्ञांना आढळलेल्या काही पुराव्यांवरून सांगितले जाते. सर्व ठिकाणांपेकी अरुणाचलम् हे एक अत्यंत पवित्र स्थान असून ते जणू जगाचे हृदय आहे. असे स्कंद पुराणात म्हटले आहे. शिव म्हणतात - ही टेकडी प्रत्यक्ष अग्नितत्वाची असूनही तिचे शांत दर्शन घडते. कारण ही जगाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी असणाऱ्यांच्या प्रेमळ तळमळीचे आणि कृपेचे द्योतक आहे. मी येथे परिपूर्ण स्वरूपात आहे. असे ध्यान करा की या टेकडीच्या हृदयातून उसळणाऱ्या आत्मिक तेजात सारे जग सामावले जाईल.

## अरुणाचलम्‌ची ओढ

महर्षी रमण यांना बालवयापासूनच अरुणाचलम् या शब्दाने आध्यात्मिक प्रत्ययकारिता निर्माण केली होती. एकदा त्यांचा मोठा भाऊ त्यांच्यावर रागावला त्यावेळी त्यांना घरापेक्षाही अरुणाचलम्‌चे महत्त्व जास्त वाटू लागले. आणि त्यांनी सरळ अरुणाचलम्‌चा रस्ता धरला.

## रमण महर्षी कोण?

तिरुचुझी येथे श्रीसुंदरम नावाचे एक प्रतिथयश वकील होते. त्यांचे मधले सुपुत्र हे रमण महर्षी होत. यांचा जन्म ३० डिसेंबर १८७९ रोजी पहाटे एक वाजता झाला. या मुलाचे नाव वेंकटरमण असे ठेविले होते. या बालकाचे प्राथमिक शिक्षण तिरुचुझी इथेच झाले. त्याची पहिली इयत्ता दिंडिगिल येथे झाली. त्यानंतर स्कॉट्स मिडल स्कूल येथे व नंतर मदुराई येथील अमेरिकन मिशन स्कूलमध्ये पुढील शिक्षण झाले. हुशार विद्यार्थी म्हणून ते शाळेत कधीच चमकले नाहीत.

## परिणामकारक घटना

खिस्ताब्द १८९५ साली घडलेली घटना बरीच परिणामकारक ठरली. तो प्रसंग असा होता, एका नातेवाईकाला रमणने सहज विचारले - आपण कोठे जाऊन आलात? ते म्हणाले - अरुणाचलम्‌ला जाऊन आलो. त्यांच्या या उत्तराचा रमणवर फार मोठा परिणाम झाला. अरुणाचलम् हे नाव ऐकताच अतिशय आनंदाने त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. बाह्यात्कारीने सर्वसाधारण मुलासारखे जीवन जगत असताना दिसत होते. या स्थितीत जुलै १८९६ पर्यंत ते होते. मग त्यांच्या जीवनात अचानक परिवर्तन घडून आले.

## एक अनोखा अनुभव

एकदा ते एकटेच आपल्या काकांच्या घरात पहिल्या मजल्यावर बसले होते. अचानक त्यांना मृत्यूच्या भीतीने घेरले. या क्षणी आपण मरणार असे तीव्रतेने जाणवू लागले.

या भितीग्रस्त मनःस्थितीतही त्यांनी कोणाला पाचारण केले नाही. ही परिस्थिती आपण स्वतःच हाताळली पाहिजे असे त्यांनी ठरविले. या वेळचा अनुभव कथन करताना ते सांगतात, ''त्या भीतीने मला अंतर्मुख केले. मी आत्मनिरीक्षण केले आणि विचार करू लागलो. मृत्यू उभा आहे. मृत्यू म्हणजे काय? मरत आहे ते कोण? हे शरीर मरत आहे. मी मरणाच्या देखाव्याचे चित्र माझ्या समोर उभे केले आहे. मी माझे अवयव सैल सोडले, व मग लाकडा सारखे ताठर केले. मी माझ्याशीच म्हणालो- आता हे शरीर मृत झाले आहे, हे आता स्मशानात नेले जाईल. आणि तिथे त्याची राख होईल. पण शरीराच्या मृत्यूबरोबर मी मृत्यू पावलो आहे काय? हे शरीर म्हणजे मी आहे काय? हे शरीर थंड आणि जड झाले आहे. पण मी मात्र चैतन्यमय आहे. 'मी' असा आवाज देखील या शरीराविना मी ऐकत आहे, म्हणून मी म्हणजे या शरीरा पलीकडील चैतन्य आहे. हा काही बुद्धिविलास नव्हता. ही एक अनुभूती होती. हे माझ्यासमोर सत्य, स्पष्ट, स्वच्छ असे निखळ.सत्य चमकून गेले. ही अनुभूती मी अर्धा तास अनुभवली. मी मृत्यूच्या भयापासून मुक्त झालो. 'मी' वर सारे लक्ष केंद्रित झाले.'' शिक्षण नाती-गोती आदी भौतिक गोष्टी संबंधींची आपुलकी नाहीशी झाली. श्रेष्ठ, कनिष्ठ, मान, अपमान, यासारख्या गोष्टींबद्दलची आस्था देखील नष्ट झाली. विनयशीलता, नम्रता आणि औदासीन्य या गोष्टीत रस वाटू लागला. मीनाक्षी मंदिरात मी बराच वेळ घालवू लागलो. 'पेरिअपुराणम्' मधील त्रेसष्ट संतांसारखे नित्य धार्मिक जीवनात रममाण होणारा साधू मी बनू शकेन, असे माझ्या या भक्तीने घडू दे. या साठी तुझी कृपादृष्टी माझ्यावर अमृत वर्षाव करू दे असे मी त्या देवीला विनवीत असे. अशी प्रार्थना करीत असे.

असा दोन तीन महिन्याचा काळ गेला. रमण यांच्या वागणुकीतील फरक नातलगांना प्रकर्षाने जाणवू लागला. अभ्यासाकडे दुर्लक्ष होत आहे हे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे 'बेनस ग्रामर' मधील एक प्रकरण तीन वेळा लिहून आणावयास सांगितले. रमणमध्ये अचानक बंडखोर वृत्ती जागी झाली. लगेच त्यांनी दप्तर बांधून ठेवले आणि डोळे मिटून शांत बसले. वडिलबंधू नागस्वामी हे सारे पाहात होते. त्याने रमणला खडसावले. रमण विचार करू लागले. खरेच माझे इथे काय काम आहे? त्यांच्या मनात लगेच अरुणाचलम्चा विचार आला. रमण चटकन् उठले व वडिल बंधूना म्हणाले. शाळेत विशेष तास आहे, त्यासाठी शाळेत जावयाचे आहे. नागस्वामी म्हणाले, पेटीतून पाच रुपये घे व माझी फी भरून टाक. रमण यांना लगेच स्फुरण चढले. त्यांनी रेल्वेचा नकाशा पाहिला. मार्गाची नोंद घेतली. तीन रुपये पुरेसे होतील, असा तर्क केला. उरलेले दोन रुपये एका चिठ्ठी सोबत ठेवून दिले आणि स्टेशनकडे कूच केले. चिठ्ठीतील मजकूर असा होता - मी येथून पिताजींच्या शोधासाठी त्यांच्याच आज्ञेवरून निघत आहे. हा सत्कार्यासाठी घेतलेला साहसी उपक्रम आहे. म्हणून कोणालाही याच्याबद्दल दुःख मानून घेण्याचे कारण नाही. यासाठी शोध घेण्याची, पैसे खर्च करण्याची आवश्यकता नाही. तुझ्या कॉलेजची फी मी अद्याप भरलेली नाही, सोबत दोन रुपये ठेवलेले आहेत.

### अरुणाचलम्ला प्रयाण

गाडी उशीरा असल्याने रमण यांना उशीर होऊनही गाडी मिळाली. त्यांनी दिंडीगल पर्यंतच तिकीट खरेदले होते. काटपाडी रेल्वेरस्त्यावर तिरुवनमलाई हे स्टेशन लागते. ही माहिती त्यांना गाडीतील सहप्रवाशाकडून कळली. विलुपूरला पहाटे तीन वाजता गाडी पोहचली. तेथे रमण उतरले. अरुणाचलम्चा रस्ता शोधण्यासाठी रमण सकाळी गावात गेले. त्यांना सपाटून भूक लागली होती. ते एका उपाहारगृहात गेले. जेवणासाठी अद्याप थोडा अवधी होता. तोवर डोळे मिटून शांत बसले लवकरच जेवण वाढण्यात आले. रमणकडे फक्त दोन आणे होते. ते त्यांनी जेवणासाठी मालकाला देऊ केले. मालकांनी

त्याच्याकडे पाहिले व त्यांची स्थिती ओळखून त्यांनी त्याच्याकडून पैसे घेतले नाहीत. त्या पैशात रमणने पुढील स्टेशनचे तिकीट खरीदले. मग तेथून पुढे पायी प्रवास करायचे ठरवले.

अरयणि निल्लूर गावीच दिवस मावळला. मंदिरातून प्रकाश येत असलेला पाहून ते मंदिराकडे येऊन गाभाऱ्यात गेले. बाहेर येऊन ध्यानस्थ बसले. तेथील पुजाऱ्याकडे थोडे अन्न मागितले. पुजाऱ्याने नकार दिला. ते त्याच्या बरोबर किल्लूर खेड्याकडे निघाले. त्या गावातील मंदीरातही हाच पुजारी होता. त्याने रमणला इथेही अन्न देण्याचे नाकारले. तेथील ढोल वाजविणाऱ्याने आपल्या अन्नातील थोडासा भाग रमणला देऊ केला. आणि पाणी पिण्यासाठी एका शास्त्र्याकडे नेले. पाण्यासाठी बराच वेळ तिष्ठत राहावे लागल्याने शुध्द हरपून रमण कोसळले. हातातील अन्नही इतस्ततः पसरले.

दुसरा दिवस गोकुळ अष्टमीचा होता. एका धार्मिक दंपतीने रमण यांना चांगले मिष्टान्न दिले व आणखी खाण्यासाठी पुडाही बांधून दिला. त्यांचा उदारपणा पाहून रमणने आपली कर्णभूषणे देऊन त्यांच्याकडून चार रुपये उसणे घेतले. पैसे मिळताच तिरुवनमलाई गाडी पकडली. १ सप्टेंबर १८९६ रोजी दुपारी चारच्या आधी ते तेथे पोहोंचले.

### मंदिराकडे प्रयाण

अधीरतेने पावले टाकीत धडधडत्या काळजाने ते मंदिराकडे आले. मंदिराचा दिंडी दरवाजा व इतर सारे दरवाजे दरबाजे उघडे होते. मंदिरात कोणी नव्हते. कोणत्याही अडथळ्या शिवाय ते गाभ्याऱ्यापर्यंत पोहोचले. दर्शन घेऊन बाहेर पडले. फिरत फिरत अयनकुलम तलावापाशी आले. त्यांच्या मनात विचार आला, हे सर्व मला या शरीरासाठी काय करायचे आहे. असे म्हणत किल्लूर येथे मिळालेला पक्वान्नाचा पुडा तलावात फेकून दिला. नंतर त्यानी अंगावरील कपडे फाडले. लंगोटी तयार केली. इतर कपडे फेकून दिले. उरलेले पैसे फेकले. जानवे काढून फेकले. डोक्यावरील सुंदर झुलपे काढून घेतली. इतक्यात पावसाची सर आली. अनायासे स्नान झाले. पुनःमंदिरात प्रवेश करून सहस्त्रखांबी मंडपात आपल्या तपःसाधनेला प्रारंभ केला.

तिथे फार काळ त्यांना राहाता आले नाही. उनाड मुलांकडून त्रास होऊ लागला. त्या मंदिराजवळच एका निवांत जागी असलेल्या पाताळ लिंगम् येथे गेले. इथे क्वचितच लोकांची ये-जा होत असे. इथे ते समाधीत मग्न असायचे. मात्र येथील किड्यांचे ते भक्ष्य बनले. त्याकडे त्यांचे लक्ष नव्हते. किड्यांच्या चावण्यामुळे काही वेळा अंगातून रक्त ठिबकत असे. हे दृश्य पाहून लोकांनी त्यांची काळजी घेण्याचे ठरवले. लोक त्यांना स्वामी म्हणू लागले.

त्यांनी सुब्रह्मण्यम्च्या पवित्र मंदिरात काही आठवडे घालवले. नंतर जवळच असलेल्या फुलांच्या बागेत ते गेले. आपल्यावर अनुग्रह होईल या इच्छेने तेथे एक परिचारक स्वामींची सेवा करू लागले. स्वामींना त्रास देण्याचे सत्र अद्याप चालूच होते. परिचारकाच्या अनुपस्थितीत एकदा कोणीतरी स्वामींच्या अंगावर घाणेरडे पाणी फेकले. या घटनेमुळे स्वामीविषयींचा लोकांमध्ये आदर वाढीला लागला. त्यांना त्रास होणार नाही हे पाहिले जाऊ लागले. स्वामींना या जागेत साधना करताना व्यत्यय येऊ लागल्याने त्यांनी गुरुमूर्तम या उपनगरीत जाण्याचे ठरविले.

इथे स्वामींची खरी ओळख सर्वांना पटली. सर्व लोक त्यांना स्वामी या नावाने ओळखू लागले. त्यांच्या सेवकांनी अभिषेक करण्याची तयारी दर्शवली त्यावेळी स्वामी म्हणाले या शरीरासाठी अन्न सेवा पुरेशी आहे. हे कोळशाने दगडावर लिहून विदित केले. यामुळे स्वामीजी हे शिक्षित

आहेत याचा बोध झाला. एकजण तर त्यांच्याकडे नावाबद्दल हट्ट धरून बसला. नाइलाजाने स्वामींनी आपले नाव 'वेंकटरमण तिरचुझी' असे लिहून दाखविले. तिरुचुझी गाव कोठे आहे हे त्याला माहीत नव्हते. 'पेरिअपुराणम्' मध्ये स्तुती केलेले व गौरविलेले ते गाव असल्याने मागाहून त्याला समजले.

**कुटुंबियांना ठावठिकाणा कळला.**

स्वामींची माहीती कर्णोपकर्णी पसरू लागली. मदुराई येथील एका कौटुंबिक मेळाव्यात ही बातमी नातलगांच्या कानापर्यंत पोहोचली. थोड्याच दिवसात नेलियप्पा अय्यर-स्वामींचे चुलते-तिरुवनमलाईला आले. त्यावेळी स्वामींचा मुकाम एका आमराईत होता. चेहरा धुळीने माखलेला, जटा वाढलेल्या, नखे वाढून वाकडी झालेली, अशा स्वरूपात स्वामी त्यांना पहावयास मिळाले. त्यांना अशा स्वरूपात पाहून एक प्रकारे समाधान वाटले की आपल्या कुटुंबातली एक व्यक्ती या परम अवस्थेला प्राप्त झाली आहे. स्वामिंनी आपल्याकडे येऊन रहावे अशी चुलत्यांनी गळ घातली. स्वामींनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. चुलते आले तसे गेले.

**मातोश्रींची भेट -**

चुलते आल्या पावली परत फिरले. त्याने अत्यंत आनंदाने मातोश्रींना ही बातमी सांगितली. त्या समक्ष गेल्यास कदाचित मुलगा परत येईल. असे सुचविले. नागस्वामी - स्वामींचे वडील बंधू यांना रजा मिळताच मातोश्री त्यांच्यासह तिरुवनमलाईला आल्या. त्यांना पवन कुद्रू येथे एका खडकावर स्वामी झोपलेले दिसले. मातेने मुलाला ओळखले. तिने खूप विनवणी केली तिच्या विनवणीचा काही उपयोग झाला नाही. परी नेण्याचा मातेनी अनेक प्रकारे प्रयत्न केला. स्वामींनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. शेवटी कागदावर लिहून एकदाचे उत्तर दिले. ते उत्तर असे होते.'' जीवात्म्याचे विधि लिखित त्याच्या पूर्वकर्मानुसार, वा, प्रारब्धानुसार दैवाधीन असते. जे काही प्राक्तनानुसार घडणार नसते ते घडत नाही. जे काही ठरलेले असते ते थांबविण्यासाठी काही केले तरी ते घडतच असते. म्हणून उत्कृष्ट मार्ग हाच की आपण शांत व स्तब्ध राहावे.'' या चिठीने शेवट झाला. नागस्वामींची रजा संपत आल्यामुळे ती उभयता मदुराईला परतली.

(क्रमशः)

शं. वा. मठ
६, कुमार आशिष
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

•••

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

श्रावणस्मृती...

# मातृदिन

*'मदर्स डे' पेक्षा भारतीय पंचांगातील मातृदिन अधिक जिव्हाळ्याचा आहे. मुळात आईचं नातं हेच प्रेम या शब्दाचा अर्थ असतं. त्या आईबद्दल-संपादक*

श्रावण अमावस्या म्हणजे पिठोरी अमावस्या. ही अमावस्या 'मातृदिन' म्हणून साजरी केली जाते.

'आई, आई ये इकडे, माझे गाणे एक गडे' या बडबड गीतापासून अनेक कवींनी अनंत कविता लिहिल्या. यशवंताची 'आई' ही कविता आणि त्यातील 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' ही पंक्तीतर मराठी साहित्यात अजरामर आहे. 'प्रेमस्वरूप आई, वात्सल्य सिंधू आई' किंवा 'आईसारखे दैवत साऱ्या जगतामध्ये नाही' म्हणून श्रीकाराच्या नंतर शिकणे अ, आ, ई ह्या सारख्या कविता आईचा महिमा अधोरेखित करतात. बहिणाबाई तर 'लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते' असे म्हणून आईच्या त्यागाची परिसीमा दाखवून देतात. सासरी कितीही त्रास असो, तो सर्व सहन करून आई सासरी नांदते, ती केवळ आपल्या मुलीला माहेर मिळावं म्हणून. फ.मु.शिंदे म्हणतात - आई खरच काय असते?

लेकराची माय असते, दुधाची साय असते.
लंगड्याचा पाय असते, धरणीची ठाय असते.

तर अशोक बुरबुरे आपल्या आईची थोरवी सांगताना म्हणतात-

माह्या मायपुढे थिटे, समदे देऊळ राऊळ
तिच्या पायाच्या चिऱ्यात, माह्य अजिंठा वेरूळ.

विठ्ठल उमप म्हणतात, मला पंढरीला जाण्याची गरजच काय? -

जाऊ कश्याला मी बाप्पा
उगा पंढरीच्या ठायी

घरी बाप हो इठ्ठल
महा माय रखुमाई



संतोष नारायणकरांच्या कवितेत आणखी एक सुंदर प्रतिमा येते-

ऐका ऐका दोस्त हो, माय बापाची कहाणी
बाप नारळी खोबरं, माय नारळाचं पाणी

अनिल दिक्षितांना निसर्गातही आई दिसते-

आई खळाळता झरा, आई समुद्राची लाट
सारे विश्व जोडणारी, आई सुंदरशी वाट
नाही परीक्षा देणगी, आई मुक्त विद्यापीठ
येतो पहिला नंबर इथे प्रत्येकाचा थेट

कवी प्रणव म्हणतात-

आई, तू चालून चालून
रीक्षाचे पैसे वाचवून
जेव्हा मला आईस्क्रीम आणून द्यायचीस
तेव्हा मला कळले, इकॉनॉमिक्स म्हणजे काय
आई, तू फाटकी चप्पल शिवून
मला जेव्हा स्पोर्टस् शूज घेऊन द्यायचीस
तेव्हा मला कळलं, मॅनेजमेंट म्हणजे काय

बाळ कितीही मोठं झालं तरी आईसाठी ते बाळच असतं, म्हणूनच कवी सुधांशु म्हणतात-

आई जपतेस मज, मी का अजून लहान
माया किती ग आंधळी, कळू नये वयमान
माझं रोडावलं बाळ, किती दिवस म्हणावं
वृद्ध होई तो मी का ग तान्ह्यापरीस जपावं

वीर देशभक्त मातृभूमीला आपली माय मानतात आणि तिला वचन देतात-

'गे मायभू तुझे मी फेडिन पांग सारे
आणिन आरतीला हे सूर्य चंद्र तारे'

आपल्या सर्वांचे लाडके माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम म्हणतात-

'समुद्राच्या लाटा, सोनेरी वाळू, यात्रेकरूंचा विश्वास, रामेश्वर ची मशीद
तो रस्ता... सर्व एकात्म होऊन बनते माझीआई...
माझी प्रिय आई'

आई लेकराच्या नात्याइतकं निरपेक्ष सुंदर नातं दुसरं कुठलंच नाही.पण आई काय फक्त माणसांनाच असते! पशुपक्ष्यांनाही आई असतेच की-

'घार हिंडते आकाशी, लक्ष तिचे पिलापाशी'
किंवा - 'चारा मुखी पिलांच्या चिमणी हळूच देई
गोठ्यात वासरांना या चाटतात गाई'

या ओळी हेच सांगतात. छोटीशी चिऊताई गाढ झोपलेली, 'उठा, उठा चिऊताई, सारीकडे उजाडले' असे म्हटले तरी आज तिचे डोळे उघडत नाहीत. पण बाळाच्या चाऱ्याची आठवण करून दिल्यावर मात्र ती आळस झटकून लगेच उठते -

'झोपलेल्या अशा तुम्ही, बाळासाठी चारापानी
आणायचे सांगा कुणी, चिमुकल्या
बाळाचे ही नाव घेता, जागी झाली चिऊताई
उडोनिया दूर जाई भूरभूर
'क्षणोक्षणी पडे, उठे परिबळे, उठे बापडी'

या कवितेतील जखमी पक्षीण, तशाच अवस्थेत पिलाच्या ओढीने आपल्या घरट्याकडे परतते आणि म्हणते

'म्हणाल भुलली जगा, विसरली प्रिया लेकरा
म्हणून अतिसंकटे उडत पातले मी घरा'

ही कवितेतील पक्षीण आणि ओला दिवस २६ जुलैच्या रात्री नोकरीच्या ठिकाणावरून घरी परतणारी आई एकच नाही का? आई, मग ती 'माय' असो की 'मम्मी' तिचं प्रेम सारखच असतं-

'पोर काटेवनाच्या वाटेवर, घरात मायचा जीव तळमळतो'
'उशीरा येणाऱ्या बेबीसाठी, मम्मीचा मोबाईल हळहळतो'

आईविषयक या कविता वाचताना माझ्या मनात आलं माझ्या स्वतःच्या आईला ही मातृदिनी आगळी वेगळी भेट दयावी, शब्दफुलांची. म्हणून खास तिच्यासाठी कविता करून मी तिला ऐकवली-

आई असते वसंत ऋतू
आपल्या आयुष्यात बहर आणणारी
आई असते ग्रीष्म ऋतू,

आपल्या आयुष्यातील दुःखाचे चटके स्वतःच सोसणारी
आई असते वर्षा ऋतू
आपल्या आयुष्यात सुखाची रिमझिम बरसात करणारी
आई असते हेमंत ऋतू,
आनंदाच्या थंडगार लहरी आपल्या आयुष्यात उठवून जाणारी
आई असते शरद ऋतू,
प्रेमाच्या शीतल चांदण्यात न्हाऊ घालणारी
आई असते शिशिर ऋतू

आपल्या आयुष्यातील संकटाची पाने टपटप गाळून टाकणारी

अशी ही आई बारा महिने आपल्यावर मायेचे छत्र धरणारी. आईचं काळीज असणाऱ्या सगळ्यांनाच मातृदिनी त्रिवार वंदन!

**सौ. मैत्रेयी शेवडे**
शिक्षिका, माध्यमिक विभाग,
सौ.ए.के.जोशी स्कूल, ठाणे.
९२२४७३४०३८

श्रावणस्मृती...

# निमित्त मंगळागौरीचे

*प्राचार्या डॉ. सिंग यांनी मंगळागौर कार्यक्रमा निमित्ताने व्यक्त केलेले विचार - संपादक*

"सर्वप्रथम मी, डॉ. सौ. शकुंतला सिंग, सौ. सुमेधा बेडेकर आणि त्यांच्या सहकारी भगिनींचे आभार मानते. की त्यांनी मला मला 'मंगळागौर' या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणी म्हणून आमंत्रित केले.

मंगळागौर हा स्त्रियांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा उत्सव. या दृष्टीने मी जेव्हा विचार करायला लागले, तेव्हा माझ्या मनात तीन प्रश्न घोळायला लागले.

१) मंगळागौर म्हणजे काय?

२) मंगळागौर कशी साजरी करावी?

३) मंगळागौर का साजरी करावी?

स्त्रियांचे जे काही सण आणि उत्सव आहेत. त्यात मंगळागौर हे व्रत मोडते. ही पिढ्यानुपिढ्या चालत आलेली परंपरा आहे. नवीन लग्न झालेल्या स्त्रियांसाठी सर्व नातेवाईकांनी, मैत्रिणींनी मिळून साजरी करण्याची ही रात्र आहे. मंगळागौर श्रावणामध्येच साजरी केली जाते, त्यामागे कारणही तसेच आहे. निसर्ग नव्याने बहरलेला असतो हा बहर नवीन लग्न झालेल्या मुलीच्या जीवनात यावा निसर्गाशी तिचे नकळत व अतिशय नाजुक असे नाते जडावे. निसर्गाचा आस्वाद घेता घेता नवीन प्रपंचात तिने पाऊल टाकावे या करिता हा उत्सव.

या प्रसंगी देवीची पूजा केली जाते. आपल्या पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना देवीकडे केली जाते. त्यावेळी लागणारी सामग्री ही श्रावणाचेच देणे असते. रात्र जागवण्याने या उत्सवाला बहार आणली जाते ती आपल्या भाव भावना व्यक्त करून, नवीन नवरी आपल्या नाजूक भावना मोकळेपणाने आपल्या मैत्रिणींसमोर व्यक्त करते. ती या गाण्यांतूनच.

हा एक सांस्कृतिक वारसा आहे. त्याला जोड आहे ती शारीरिक खेळाची, मानसिक भावना व्यक्त करायची. त्याला जोड आहे ती विज्ञानाची.

आज आपण पाहतो की स्त्रियांना खास व्यायाम करण्याची गरज आहे. त्यासाठी त्या जीम मध्ये जातात. तर खोलीमध्ये व्यायाम करतात त्याऐवजी मंगळागौरच्या निमित्ताने त्यांची जी अतिशय योग्य अशी हालचाल होत असते, विविध खेळातून व्यायाम होत असतो तो केवळ मनोरंजनाचा भाग नाही तर अतिशय आवश्यक असा सांस्कृतिक वारसा जपणारा भाग आहे. तो आपण आपल्या येणाऱ्या पुढील पिढीला  आहे तसा देणार आहोत, सोपवणार आहोत, आणि यांच साठी आपण मंगळागौर साजरी करणार आहोत.

पुढची पिढी ही अतिशय बुद्धिमान आहे. आपण त्यांना वैज्ञानिकदृष्ट्या मंगळागौर कशी महत्वाची व उपयुक्त आहे हे त्यांना पटेल रुचेल अशा माध्यमांतून त्यांच्यापर्यंत पोहचविणे हे आपले कर्तव्य आहे.

ही मंगळागौर वरकरणी दिसते तशी म्हणजे चार बायका जगतात, नाच फुगडी खेळतात, गाणी गातात अशी नाही. तर तिच्या अंतरंगात मानसिक, शारिरीक, धार्मिक सांस्कृतिक उत्कर्षाचा ठेवा दडलेला आहे. कालानुरूप बदल करून तो आपण आत्मसात करावा.

आज  मंगळागौरच्या निमित्ताने साजशृंगार केलेल्या स्त्रिया पाहिल्या, मंगळागौरचा आनंद लुटला तेव्हा माझं सासर महाराष्ट्रात नाही याचा मला खरोखर खेद वाटला."

डॉ. सौ.शकुंतला सिंग

प्राचार्या, जोशी बेडेकर  महाविद्यालय, ठाणे.

श्रावणस्मृती...

# एक उपयुक्त पुस्तिका

*मंगळागौरीसाठी कोणती गाणी म्हणतात, म्हणावीत याचे कालानुरूप मार्गदर्शन करण्यासाठी ही पुस्तिका - संपादक*

मंगळागौर पूजणे हा एक संस्कार आहे, एक मांगल्य आहे. आज सगळेच झटपट उरकणे चालू आहे त्यातच मंगळागौरी सारखी पूजाही 'इंस्टंटली' आटोपली जाते. जगायलाही वेळ नाही. अशा विचित्र गतीचा परिणाम आजच्या जीवनशैलीवर झालेला आहे. हळदीकुंकवापासून भोंडल्यापर्यंत आणि केळवणापासून डोहाळेजेवणापर्यंतचे सांस्कृतिक क्षण लोकलच्या डब्यात साजरे करण्याचा हा काळ आहे.

या पार्श्वभूमीवर काही संस्था, मैत्रिणींचे काही गट अगदी ठामपणे संस्कार जपण्याचा वसा सांभाळतात. अगदी पारंपरिक पद्धतीने रात्रीची जागरणे करणे, खेळ करणे, उखाणे, भेंड्या हे सर्व केले जाईल असे पाहतात. अर्थात गरज ही शोधाची जननी असते त्यानुसार शहरी स्त्रियांची ही गरज हेरून पैसे कमवण्याचा शोध लावलेल्या मैत्रिणींचे व्यावसायिक गटही आहेतच. व्हिडीओवर किंवा संगणकावर हिंदी चित्रपट पाहत एकत्रित जमून बारा वाजवायचे,उद्या ऑफिस आहे म्हणत झोपायचे त्यापेक्षा हे बरेच म्हणावे लागेल!

जुन्या पिढीबरोबर त्या पिढीच सूचित अस्तंगत होण्याचं प्रमाण वाढतंय. त्यामुळे, आठवणीत असणारी ठळक गाणीही संपत चालली आहेत. संस्कार भारतीच्या ठाणे विभागाने प्रकाशित केलेली 'मंगळागौरीचे खेळ शिबिर' ही पुस्तिका वाचण्यात आली. जुन्या आणि नव्या पिढीच्या विचारांचा सांधा जुळवायचा क्षण म्हणजे सण हा सणांचा पारंपरिक अर्थ पुस्तिकेत चांगल्या प्रकारे स्पष्ट करण्यात आला आहे.

पुढच्या भागात या छोट्या पुस्तिकेत मंगळागौरीचा म्हणजेच आदिशक्तीच्या, मांगल्याच्या पूजनाचा अर्थ थोडक्या आणि नेमक्या शब्दात उलगडून दाखवला आहे.१६ पत्री, त्यांचा प्रतीकात्मक अर्थ अणि आदिशक्तीचे विश्वव्यापक स्वरूप याबद्दल नवविवाहित भगिनींना माहिती दिली आहे.

फुगडी हा महाराष्ट्रातील स्त्रीचा आवडता पारंपरिक खेळ. या फुगड्यांचे असंख्य प्रकार आहेत. त्यातील काही प्रकार पुस्तिकेत दिले आहेत. रात्र जागवताना, मंगळागौरीची म्हणून खास रूढ झालेली असंख्य गीते हे मराठी लोकसाहित्याचे धन आहे. या छोट्या पुस्तिकेत हे संचित नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा, जतन करण्याचा स्तुत्य प्रयत्न केलेला आहे.

स्त्रियांच्या खेळाचा आणखी एक विशेष म्हणजे असे खेळून झाल्यावर जो 'ब्रेक' घेतला जाई त्यातही काहीतरी कल्पक, मनाला आल्हाद देणारे बोलावे, यातूनच उखाणे घेणे, गाणी म्हणणे, भेंड्या खेळणे हे प्रकार विकसित झाले. या पुस्तिकेत अशा थोड्या भेंड्यांचा समावेश करण्यात आला आहे.

पुस्तिकेच्या रूपाने खास मराठी संस्कार जतन करण्याचा, त्यांचा प्रसार करण्याचा संस्कार भारतीचा हा प्रयत्न नक्कीच उल्लेखनीय आहे. मंगळागौरीची आरती व ज्ञानेश्वर महाराजांचे पसायदान यांनी पुस्तिकेचा समारोप केलेला आहे. यातील साहित्याचे संकलन पारंपरिक संस्कार व रूढींचा अभ्यास करणाऱ्या, त्यांचे कालानुरूप चिंतन करणाऱ्या सौ. सुमेधाताई बेडेकर यांनी केले आहे. संस्कार भारतीच्या ठाणे महानगर महिला शक्ती विभागाने पुस्तिका

प्रकाशित केली आहे. सुमेधाताई मातृशक्ती विभागाच्या प्रमुख आहेत. तर श्रीमती मेघा पोंक्षे महिलाशक्ती विभागाच्या प्रमुख व श्रीमती वैदेही गांगाल सहप्रमुख आहेत.

ही उपयुक्त छोटेखानी पुस्तिका वाचल्यावर आठवण आली ती लोकसाहित्यात अत्यंत भरीव काम करणाऱ्या सरोजिनी बाबर यांची. संस्कार भारतीच्या ठाणे शाखेने त्यांच्या साहित्याच्या धर्तीवर मराठी स्त्री साहित्यातील मातृशक्तीची संकल्पना स्पष्ट करून सांगणारी ग्रंथसंपदा संकलित करावी. त्यासाठी लोकसाहित्याबरोबरच नागर साहित्याचा विचार करावा. संस्कार भारती, कला व कलासंस्कार यासाठी जे मोठे कार्य करते त्यात ही मोलाची भर ठरेल.

अर्थात सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे आजच्या गतिमान जीवनासाठी या प्रकारच्या पुस्तिका ही देखील काळाची गरज आहे. भगिनींना त्यांच्या पर्समध्ये ठेवता येतील, कधीही वापरता येतील अशा पुस्तिका तयार केल्या जाणे हे ही महत्त्वाचं आहे.

**प्रा. मोहन पाठक, ठाणे**

मंगळागौरीचे खेळ शिबिर
सौ. सुमेधा वेडेकर, संकलन
संस्कार भारती, ठाणे महानगर , ठाणे.






विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर, ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये, एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही,
दु:खावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच माझी इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावंस ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सांत्वन केलं नाहीस तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा

**- गुरुदेव रवींद्रनाथ टागोर**

# निसर्गरम्य केळवे

*प्रा. अशोक ठाकूर यांनी केळव्याच्या शितलादेवीची ओघवत्या शैलीत माहिती दिली आहे. हा लेख वाचून केळव्यात हमखास जावेसे वाटेल -संपादक*

पश्चिम रेल्वेच्या पालघर स्थानकापासून सुमारे बारा किलोमीटर व केळवे रोड स्थानकापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर केवळे हे ऐतिहासिक व पौराणिक वारसा लाभलेले निसर्गरम्य गाव वसले आहे. एस्.टी.च्या गाडीने गावात प्रवेश करताच रस्त्याच्या दुतर्फा पसरलेल्या नारळी-पोफळीच्या, केळी-पानवेलीच्या लांबच लांब बागा दृष्टीस पडतात. ताडा-माडाचे वृक्ष पित्याचे प्रेमळ छत्र त्याच्यावर ठेऊन मायेची सतत पखरण करीत असतात. दृश्य मोठे मनोहर आणि विलोभनीय दिसते. रस्ता शांत, शीतल आणि आल्हादकारक आहे. वृक्षराजी नतमस्तक होऊन केळव्यात येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागतास सज्ज असल्याचे भासतात.

केळवे हे पूर्वी प्रसिध्द बंदर होते. या बंदरातून गुजराथ, काठेवाड या भागाशी व्यापार-उदीम चालत असे. मोठमोठ्या पडावांतून या भागात उत्पादित होणारी केळी, ऊस, आले इत्यादी बागायती उत्पादने निर्यात होत असत व किराणा माल, पेंड यांची आवक होत असे. बंदर खोल असल्याने मोठमोठी जहाजे या बंदरांतून ये-जा करीत असत. त्यामुळे आरमारीदृष्ट्या या बंदराला फार महत्व त्याकाळी होते. याची साक्ष एक जलदुर्ग व दोन भुईकोट किल्ले देतात. केळव्याचा किनारा जवळ-जवळ दोन किलोमीटर पसरलेला आहे. किनाऱ्यावरील सुरूची नयनरम्य बाग अतिशय सुरेख आणि रमणीय आहे. किनारा स्वच्छ व विस्तीर्ण असून किनाऱ्यावरील सोनेरी वाळू नेहमीच मोहवत असते. कुटुंबासमवेत अथवा मित्र मैत्रिणींच्या समवेत सुखदुःखाच्या गुजगोष्टी करीत येथे दिवस कधी मावळतो तेच लक्षात येत नाही. त्यामुळे एक दिवसाच्या सहलीसाठी केळवे हे मुंबईकरांचे एक आवडते पर्यटन स्थळ होऊन बसले आहे. या गावात सर्व सोयींना सुसज्ज अशी चार रिसॉर्टस आहेत. जेवण, नाश्ता, चहापान व राहण्याची सोय उत्तम तऱ्हेने केली जात असून, काहींना एमटीडीसीची मान्यताही मिळालेली आहे.

अशा या प्रसन्न गावात पुराणप्रसिध्द श्रीशितलादेवीचे जागृत देवस्थान आहे. दरवर्षी येथे चैत्र शुध्द पौणिमेस मोठी यात्रा भरते. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिक, सातारा वगैरे शहरांतून देवीचे हजारो भक्तगण देवीच्या दर्शनास येतात. देवीचा चेहरा अतिशय शांत असून तेजस्वी आहे. ती भक्तांच्या संसारात सतत सौख्याची शीतल छाया पसरवीत असते म्हणून तिला शितलादेवी म्हणतात. देवी, गोवर, कांजण्या इत्यादींवर गुण यावा म्हणून अनेक श्रध्दास्थान भक्तगण या देवीला नवस बोलतात. देवालयाजवळ बगलवाडी म्हणून अनेक भाग आहे. पूर्वी देवी गुप्तरुपाने या भागात राहत होती. पुढे तिने दृष्टांत दिला व नंतर गोपाळ पंथियांनी देवालय बांधले अशी कथा आहे. त्यानंतर सतराव्या शतकांत ग्वाल्हेर संस्थानच्या महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मंदिराचा जीर्णोध्दार केला.पूजा-अर्चा व देवस्थानाची व्यवस्था यासाठी वर्षासन व वतन यांची व्यवस्था करण्यात आली होती. पेशव्यांच्या नावे ही सनद देण्यात आली होती. सध्याचे देवीचे सुंदर मंदिर देवीचे परमभक्त व तत्कालीन महसूलमंत्री आदरणीय नामदार भाऊसाहेब वर्तक यांच्या मार्गदर्शनाखाली, केवळे गावातील सुजाण नागरिकांनी दानशूर भाविकांच्या उदार व भरघोस देणग्यांतून जवळ जवळ चौदा लक्ष रूपये खर्च करून प्रसिध्द वास्तुशास्त्र

श्री. प्रभाकर सावे यांच्या कल्पनेतून साकारलेले प्राचिन शिल्पकलेला आधुनिक शिल्पकलेची जोड देवून उत्तम प्रकारे बांधले आहे. देवींचे मंदिर निसर्गरम्य अशा समुद्रकिनाऱ्यावर आहे. सागराच्या धीरगंभीर लाटा देवींची स्तुतिसुमने गाताना भक्तांना नेहमीच पहावयास मिळतात. देवींचा व्दारपाल-गोवळा देवालयाच्या बाहेर उभा असून त्याचे दर्शन घेऊनच भक्त देवालयात प्रवेश करतो. देवालयासमोर रामकुंड नावाचा तलाव आहे. दंडकारण्यात श्रीराम आले असता सीतेला तहान लागली, म्हणून श्रीरामाने हा तलाव निर्माण केल्याचे सांगतात. या तलावात स्नान केले असता त्वचेचे सर्व रोग पूर्ण बरे होतात. या तलावाचे नूतनीकरण पालघरच्या माहेरवाशिणी व अमेरिकेंत अॅटलांटा येथे स्थायिक झालेल्या डॉ. मीना राव यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ देवस्थान ट्रस्टला रु.पाच लक्ष रुपयांची देणगी देऊन करून घेतले आहे. या तलावांतील कारंजे आकर्षक आहे. हजारो पणत्या उजळून वैकुंठ चतुर्दशीला साजरा केला जाणारा दीपोत्सव भाविकांचे व परिसरातील सर्व लोकांचे मन उल्हासित करून जातो. याच देवालयांत असलेल्या स्वयंभू शिवलिंगावर गंगेचे कायम वास्तव्य आजही पहावयास मिळते. भल्या पहाटे उठून देवालयापर्यंतचा रस्ता उजळून शंकराला पहाटेच्या मंगलवेळी कमलपुष्पे वाहण्याची तसेच दसऱ्याच्या दिवशी आपट्याच्या झाडावरील पानांची सोने म्हणून लूट करून सीमोल्लंघन साजरा करणे इत्यादी प्राचीन परंपरा आजही केळवेवासियांनी जपल्या आहेत.

शितलादेवींचा परिसर भव्य आणि रमणीय आहे. या ग्रामदेवतेच्या मंदिरातील घंटेच्या निनादाने सारा आसमंत पहाटेच्या रम्य समयी दुमदुमून जातो. देवीचे परमभक्त व शक्तीचे उपासक वेदाचार्य, धनपती कै. बाबा गर्दे हे पूर्वी आपल्या सर्व शिष्यांना मद्य तीर्थ म्हणून देत. मात्र कुलगुरू गर्दे हे मद्य-मासाच्या ताटाचा फक्त वास घेत असत.

केळव्यात शितलादेवीशिवाय कालीका, राम, हनुमान ही हिंदूंची जागृत देवस्थाने असून मुस्लीम धर्मीयांचे दोन दर्गे व एक मशीद आहे. ख्रिश्चन धर्मीयांचे मातेमाऊली दांडा खाडीवरील किल्ल्यात विराजमान झालेली आहे. अशाप्रकारे सर्वधर्म स्नेहभाव या गावात गुण्यागोविंदाने नांदताना दिसतो.

केळव्याच्या सीमेवर असलेले श्रीरामभक्त हनुमंताचे एक पुरातन मंदिर आहे. अलिकडेच मच्छीमार समाजातील तरुण व उत्साही बंधूंनी देणग्या मिळवून या मंदिराचा जीर्णोध्दार केला असून मंदिराची भव्य अशी वास्तू उभारली आहे. या मंदिरात दरवर्षी चैत्र पौर्णिमेस श्री हनुमान जन्मोत्सवाचा मोठा उत्सव साजरा केला जातो. केळव्यांतील मुंबईस नोकरी-धंद्यानिमित्त गलेले सर्व मच्छीमार बंधू या उत्सवास आवर्जून उपस्थित राहतात.

केळव्यातील केळीच्या बागा पुरातन काळापासून प्रसिध्द असून कदलीवह या संस्कृत नावाचा अपभ्रंश म्हणजेच केळवे. केळव्यातील बहुतेक वाड्या रघुनाथराव शिवाजी या इतिहासप्रसिध्द श्रीमान सावकाराच्या मालकीच्या होत्या. रघुनाथराव हे फऱ्याने (पूर्वीचे एक माप) रुपये मापित. त्यांच्या गावी म्हशींच्या पायांत चांदीचे तोडे असत. त्यांची हुंडी काशीपर्यंत जात असे अशी आख्यायिका आहे. बाराव्या शतकापासून प्रसिध्द असलेल्या केळवे गावाची भरभराट प्रामुख्याने प्रतापबिंबाच्या काळात अधिक झाली. त्याने तेथे व्यापार-उदीम, शास्त्र आणि संस्कृती यांची उभारणी केली. प्रतापबिंबाचा केळव्याचा सरदार कोकाटे यांचे वास्तव्य केळव्याच्या बाजार पेठेत होते. त्याचे सैनिक प्रामुख्याने शेषवंशी, सोमवंशी व सूर्यवंशी क्षत्रिय कुळांतील होते.

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अशा या रम्य गावात ब्रिटीशांच्या काळात केळवा-माहिम नगरपालिका अस्तित्वात होती. परंतु प्लेगच्या साथीमुळे दोन्ही गावची लोकसंख्या कमी झाल्याने तत्कालीन सरकारने १ सप्टेंबर



१९२३ रोजी नगरपालिका बरखास्त करुन केळवे व माहिम या गावच्या दोन स्वतंत्र ग्रामपंचायती निर्माण केल्या.

स्वातंत्र्यानंतर केळव्यात शैक्षणिक, सामाजिक व सहकार क्षेत्रात बरीच प्रगती झाल्याचे दिसून येते. केळवे शेतकी सहकारी संस्था, मच्छीमार सहकारी संस्था, मीठ उत्पादक सहकारी संस्था, केळवे पान उत्पादक-विक्रेता संघ, नूतन विद्या विकास मंडळ ही शैक्षणिक संस्था, भारत वाचनालय ह्या सरकारमान्य ग्रंथालयाची स्थापना फ्रेंडस् स्पोर्टस् ॲण्ड सोशल असोसिएशन, युवक मित्र मंडळ इत्यादी विविध संस्था स्थापन झाल्या आहेत. केळव्यासाठी या सर्व संस्था एकदिलाने काम करीत असल्याने केळव्याची विकासाकडे आगेकूच प्रशंसनीय आहे. केळव्यातील पाच-सहा हजार लोकवस्तीत जवळजवळ ७० टक्के लोक सुशिक्षित आहेत. संमिश्र लोकवस्ती असलेल्या या गावातील लोक गुण्यागोविंदाने नांदतात. गावाच्या विकासासाठी सर्व योजना एकमताने राबविल्या जातात. केळवे वासियांनी केळव्यासारख्या एका छोट्या विकसनशील खेड्यात एप्रिल १९९४ मध्ये दुसरे कोकण मराठी साहित्य संमेलन भरवून ते यशस्वीपणे पार पाडले. त्यामुळे पु.ल. देशपांडे, मधु मंगेश कर्णिक, के. ज. पुरोहित यांच्यासारख्या सरस्वतीच्या दरबारांतील मातब्बर लेखकांचे केळव्याशी आपुलकीचे नाते जोडले गेले. सर्व थरांतील साहित्यिकांची संमेलनाच्या वेळी राहण्याची व्यवस्था केळवेकरांनी आपल्याच घरात आपला साहित्यिक पाहुणा म्हणून केली होती.

केळवे-दांडा खाडीवर तत्कालीन मुख्यमंत्री व लोकसभाध्यक्ष नामदार मनोहर जोशी यांनी केळवेकरांना दिलेल्या आश्वासनानुसार महाराष्ट्र शासनाने चार कोटी साठ लक्ष रुपये खर्च करुन प्रशस्त पूल केळव्याच्या दक्षिणेस बांधून पूर्ण केला आहे. त्यामुळे गावाशी अनेक खेडी जोडली जाऊन परिसराच्या विकासाचे ते एक वरदान ठरणार आहे.

-प्रा. अशोक रा.ठाकूर.
कार्यवाह, सोनोपंत दांडेकर, शिक्षणमंडळी,
पालघर, जि.ठाणे
भ्रमणध्वनी ९४२२६७६२८८

आपल्या प्रतिक्रिया
आवर्जून कळवा !

# ज्ञानपीठ पुरस्कार : एक विचार

*वृद्धापकाळी मिळणाऱ्या पुरस्कारांचा एक वेगळा विचार मांडणारा हा एक दृष्टिकोन आहे - संपादक*

वि. स. खांडेकर, कुसुमाग्रजांना आणि आता विंदा करंदीकरांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळाला तो वयाची (सहस्र चंद्रदर्शने झाल्यानंतर ) ऐंशी वर्षे पूर्ण झाल्यानंतर. त्यामुळे मनात आलं साहित्याचे जसे निकष असतात तसे वयाचेही होते काय!!! की, जो ऐंशी पार करेल त्यालाच हा पुरस्कार देण्यात येईल. मग एखादा त्या पुरस्कारासाठी लायक, पात्र असेल तरी ऐंशी पार केली नाही म्हणून त्याल या पुरस्कारातून बाद केले जाते की काय! (कविवर्यांची क्षमा मागून, समंतीने हा विचार मांडलाय कवितेत) खरे तर हा पुरस्कार उम्मेद असतानाच मिळायला हवा म्हणजे त्यांच्या हातून आणखी काही साहित्य सेवा होऊ शकली असती. नाही तर, अशोक नायगावकरांच्या भाषेत 'विंदाना म्हटले पुरस्कार मिळाल्यावर कसे वाटले?' 'अरे, हे म्हणजे दात गेल्यावर अक्रोड खायला दिला' असे झाले.

ज्ञानपीठ पुरस्कार

आयुष्याच्या उतरणीलाच मिळतो ज्ञानपीठ पुरस्कार

मग होतात सगळीकडे सन्मान आणि सत्कार ...

साहित्याच्या सेवेलाच ज्यांनी उभे आयुष्य वाहिले

हर्ष खेद ते मावळले, हास्य निमाले, अश्रु पळाले

अशी असते अवस्था तेव्हा त्या तपोनिधींची

उत्साह नि उम्मीद केव्हाच झाली असते खर्ची

आता देहधून लागलेली असते अनाहतात

इहलोकी एक पाय तर दुसरा परलोकात

तेव्हा एकदम घडतो काहीतरी चमत्कार

(सगळ्यांच्या नाही काहींच्याच...)

आणि आयुष्याच्या उतरणीलाच मिळतो ज्ञानपीठ पुरस्कार

मग होतात सगळीकडे सन्मान आणि सत्कार ...

कुणी होता एक इथे शब्द सृष्टीचा प्रभू

त्याला होती जिद्द मोठी अपर सृष्टी उभवू

पण आयुष्याचं दान अपुरं पडलं झोळीत

अपरसृष्टी घडविणारा बसला होता चोळीत

म्हणे, आहे एखाद्यावर्षी मला मिळावा ज्ञानपीठ पुरस्कार

कसा माझ्या लेखणीचा वाचकशी अविष्कार

पण त्याला काय माहित इथल्या निकषांचे प्रकार !!!

की आयुष्याच्या उतरणीलाच मिळतो ज्ञानपीठ पुरस्कार

मग होतात सगळीकडे सन्मान आणि सत्कार ...

'महाराष्ट्र साहित्य पत्रिका जाने. फेब्रु. मार्च २००६ च्या अंकात असे म्हटले आहे की, १९८८ साली कुसुमाग्रजांना 'ज्ञानपीठ' पुरस्कार देण्यात आला. त्यानंतर १८वर्षे निदान, १५ वर्षे तरीच गेली. मराठी कवींला पुरस्कार मिळाल्याचा आनंद आहेच.

डॉ. गिरीश कर्नाड व डॉ. यू. आर. अनंत मूर्ती या दोन कन्नड लेखकांना हा सन्मान विंदानंतर मिळाला असता तर काय बिघडले असते? (स्वतः गिरीश कर्नाड यांनी तसे

बोलूनही दाखवले आहे.) विंदाना बाधीच हा सन्मान दहा बारा वर्षापूर्वी प्राप्त होता तर गौरवांचा स्वीकार करण्यासाठी महाराष्ट्रभर त्यांना जाता आले असते. रसिकांना भरभरुन भेटता, ऐकता आले असते. आज ते ८६ वर्षाचे आहेत. बाहेर जाऊ शकत नाही. ज्ञानपीठासंबंधी निर्णय घेणाऱ्या समितीला असल्या व्यावहारिक बाबींही महत्त्वाच्या आहेत असे का वाटत नाही? गेल्या दहाबारा वर्षात विंदांच्या कवितांबाबत परीक्षकांच्या पदरात काही नवे पडले असेल, नक्कीच म्हणता येत नाही. मराठी काव्य प्रेमींनी याबाबत आवाज उठवलाच पाहिजे.

आणि म्हणूनच एका काव्यप्रेमीचा हा 'आवाज'.

आशा भिडे
बी/९, विजय अपार्टमेंटस्
आराधना टॉकीजवळ, ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०

## विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था

१) डॉ. बेडेकर प्राथमिक विद्यालय (मराठी माध्यम)

२) डॉ. बेडेकर माध्यमिक विद्यालय (मराठी माध्यम)

३) सौ. आनंदीबाई जोशी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी)

४) सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विद्यालय (इंग्रजी)

५) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

६) ना. गो. बेडेकर वाणिज्य व के. ग. जोशी कला महाविद्यालय

७) टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

८) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

९) व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

१०) प्रगत अभ्यास केंद्र

## उपक्रम

भावे व्याख्यानमाला

व्ही.पी.एम्. दिशा

# ''ग्रंथालयाकडून माझ्या अपेक्षा''

*ग्रंथालय सेवा समूहाच्या एका स्पर्धेतील हा लक्षणीय लेख आहे. वाचकांच्या अपेक्षांचा अंदाज येणे या लेखावरुन शक्य आहे. या महिन्यातील ग्रंथालय सप्ताहाच्या निमित्ताने लेख देत आहे. - संपादक*

The true university of these days is collection of books - CARLYLE

विचार प्रगट करण्याची साधने दोन; वाणी आणि लेखणी. जे काही बोलले जाते, तेच पुस्तकात ग्रथित होते. वक्तृत्व व लेखन यांचा संबंध घनिष्ट आहे. बोलताना वक्त्यास अवधी नसला तरी लिहिताना लेखक शांतपणे विचार करु शकतो. छापण्याच्या कलेचा शोध लागला तसा ज्ञानवृद्धीसाठी वाचन, बहुश्रुतपणा, मनन, चिंतन इत्यादी गोष्टींची आवश्यकता भासू लागली.

ज्ञान चिरस्थायी होण्यासाठी राजकारण, ललित कला, धर्म, काव्य इत्यादी अनेकविध विषयांवरील लेखकांनी आपले अनुभव कथन केलेले सार म्हणजेच ग्रंथ. ज्ञानाची दालने विशाल होत असताना, सारे जग ज्ञानपिपासू होत असताना ही संपूर्ण ग्रंथ संपत्ती संग्रहीत करणे कुणाला तरी शक्य आहे का? अर्थातच नाही. म्हणूनच ही सारी संपत्ती संग्रहीत करण्याचे कार्य ग्रंथालये करतात. आणि म्हणून ग्रंथालयांचे फार महत्त्व आहे.

चाकांवर आरुढ झाल्यापासून आजचे युग विलक्षण गतिमान झाले आहे. क्षणभर शांत बसून श्वास घेण्यासही माणसाला उसंत नाही. एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, प्रतिष्ठेच्या अवास्तव व चुकीच्या कल्पना, जीवघेण्या स्पर्धा, व्यसनाधीनता, नेतृत्वाचा अभाव योग्य मार्गदर्शनाची उणीव इत्यादी गोष्टी पहाता, आजच्या विद्यार्थ्यांची कीव करावीशी वाटते. ज्ञानाचा प्रस्फोट इतका झाला आहे की अध्ययन अध्यापनालाही मर्यादा आल्या आहेत. 'ग्रंथ हेच गुरु' अशी पाटी बहुतेक ग्रंथालयांच्या दारावर पहावयला मिळते. विद्यार्थ्यांना पूरक ज्ञान व माहिती मिळविण्याचे ते एकमेव साधन असले तरी अलिकडच्या दूरदर्शनच्या युगात वाचनाला बसलेली खीळ पाहिली की 'वाचाल तर वाचाल' हे घोषवाक्य नसून, फोडलेला 'टाहो' आहे असे मनाला वाटते. म्हणूनच 'शाळेचे हृदय' समजल्या जाणाऱ्या या ग्रंथालयाकडून मला काही किमान अपेक्षा बाळगाव्याशा वाटतात.

वाचनालयात किंवा ग्रंथालयात मासिके, पुस्तके, वर्तमानपत्रे इत्यादींचा संग्रह असतो, तेथे वाचक येतात, ग्रंथालयाची व्यवस्था आदर्श असते. पुस्तकांची विषयांनुसार वर्गवारी केलेली असते, पुस्तकांवर अनुक्रमांक लिहिलेले असतात. पुस्तकांना काचेच्या अलमाऱ्यांमध्ये व्यवस्थित विराजित केलेले असते. प्रत्येक पुस्तकामध्ये एक कार्ड असते. त्या कार्डावर पुस्तक नेणाऱ्याचे नाव, पुस्तक नेल्याची तारीख इत्यादी गोष्टी टिपण्यात येतात. वर्तमानपत्रे, मासिके इ. ठेवण्यास टेबलांची व्यवस्था असते. वाचकांना बसण्यासाठी आरामदायी बाके , खुर्च्या असतात. पाश्चात्य देशात तर पुस्तकाचे ध्वनिमुद्रण, छायाचित्रेही आढळतात. हे कार्य तेथे यांत्रिक तऱ्हेने चालते विशेषत: लंडन व मॉस्को येथील वाचनालये पाहिली म्हणजे त्यासमोर राजप्रासादही फिके वाटतात. आपल्या देशातील जागेची अडचण लक्षात घेऊन राजप्रासाद नसले तरी हवेशीर, रम्य परिसरातील जागा नक्कीच निवडता येईल. आजच्या संगणक युगात ग्रंथालयातील कामे यांत्रिक तऱ्हेने चालवता येणे शक्य आहे.

लोकांची वाचनाभिरुची उच्च बनावी, वैचारिक पातळी वाढावी यासाठी चांगले वाङमय असणे इष्ट आहे. वाचनालयात अश्लील व नि:सत्व पुस्तकांना स्थान नको

जेणेकरुन अभिरुचि हीन बनण्याचा संभव असतो. 'झाले पुस्तक प्रकाशित की घे विकत' असा परिपाठ न ठेवता योग्य पुस्तकांची निवड ही व्यवस्थापकांनी ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. Art is long, time is fleeting या वचनाप्रमाणे आपल्या आयुष्याच्या थोड्या अवधीत आपणास जास्तीत जास्त फायदा करुन घेण्यासाठी आपण पुस्तकांचा क्रम लावणे हितदायक ठरते.

मोफत वाचनालयांमध्ये वर्गणीदारांची कर्तव्ये त्यांना समजतील अशी ठळकपणे लावावीत त्यानुसार वागल्यास वाचनाचा खरा लाभ मिळू शकेल. काही ठिकाणी फिरते ग्रंथालय असते. यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात ज्ञान पोचते करण्यास मदत होते. अर्थात, अशा वाचनालयांना पुस्तकांचे अनेक संच ठेवावे लागतात, त्यामुळे या योजनेत सरकारची मदत घ्यायला हवी. प्रत्येक शाळा-महाविद्यालयांच्या ठिकाणी असलेल्या ग्रंथालयामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते. अशा वेळी दुपारच्या सुटीत किंवा सुटीच्या दिवशी विद्यार्थी वाचनालयाचा फायदा घेऊ शकतात. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना बालवाङमयाचा फायदा घेता येईल. कोणत्याही विषयाचा सांगोपांग अभ्यास करायचा असला, तरी ग्रंथालयातील पुस्तकांचा संदर्भ ग्रंथ म्हणून फार उपयोग होतो. शिक्षणप्रक्रियेत ग्रंथालयांमध्ये उपलब्ध असणाऱ्या शिक्षणपूरक साहित्याचा वापर उदा. पुस्तके, नियतकालिके, दृकश्राव्य साहित्य-ध्वनिफिती, चित्रफिती संगणक व इंटरनेट याचबरोबर पुस्तक प्रदर्शने, नकाशे, आलेख यांचा वापर तसेच चर्चासत्रे व कार्यशाळा यांचे आयोजन हे सर्वमान्य झाले आहे. विद्यार्थ्यांना विविध अनुभवांच्या आधारे ज्ञान देण्यासाठी अनेक उपक्रम राबवून त्यांच्या कृतिशीलतेस वाव देता येईल व त्यांच्या शैक्षणिक अनुभवांत या रचनात्मक प्रकल्पांची मोलाची भर घालता येईल. यामध्ये अनेक कृतिशील उपक्रम राबवण्यासारखे आहेत. उदा. 'वृत्तपत्र कात्रण सेवा' वृत्तपत्र म्हणजे प्रचलित माहिती पुरविण्याचे लिखित साधन होय. वर्तमानपत्रातील माहितीपूर्ण व दर्जेदार लेख एकत्र संग्रहीत करुन त्यांचा शैक्षणिक संशोधन व विकासाकरिता वापर करुन घेता येईल. अन्वयार्थासह सविस्तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील बातम्या, आर्थिक व व्यापारी घडामोडी, क्रीडाविषयक हालचाली, सांस्कृतिक घडामोडी, विविध विषयांवरील विषय तज्ज्ञांनी लिहिलेली सदरे व त्यांच्या मुलाखती. राष्ट्रीय, प्रादेशिक आणि ग्रामीण भागात चाललेली कार्ये व विविध प्रश्नांवरील माहितीपूर्ण लेख, व्यक्तिचित्रे, समीक्षणात्मक लेख, ऐतिहासिक व भौगोलिक माहिती इ. माहितीचे संकलन वृत्तपत्र कात्रणांच्या साहाय्याने केल्यामुळे ग्रंथालयांचा गुणात्मक विकास साधला जाईल.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते।
तत: योगसंसिद्ध: कालेन आत्मनि विन्दति॥ (गीता-४)

या जगात ज्ञानासारखी दुसरी पवित्र गोष्ट नाही. ज्ञान हे दिवसेंदिवस वाढते. ग्रंथसंपदा वाढते, ग्रंथालय मात्र तेवढेच राहते. ग्रंथालयाला अन्य इमारत किंवा नवी जास्तीची जागा मिळत नाही. त्याचप्रमाणे ग्रंथालयामध्ये असलेले ग्रंथपाल यांच्या वैशिष्टपूर्ण सेवेचाही ग्रंथालयाच्या व्यवस्थापनावर परिणाम होतो. वाचकांना, अभ्यासकांना, विद्यार्थ्यांना हवे असलेले ग्रंथ ग्रंथपालाने जर आधीच वाचले असतील तर तो वाचकांना त्या ग्रंथविषयी माहिती देऊ शकेल. तसेच त्या ग्रंथांसारखा अन्य ग्रंथही तो देऊ शकेल. तात्पर्य हेच की, अभ्यासू ग्रंथपाल अनेक परीने वाचकांना सेवा उपलब्ध करुन देतो. ग्रंथपालाने आपल्या सेवेची आवड वृद्धिंगत केली पाहिजे सेवा मागण्यासाठी आलेल्या वाचकांचे, संशोधकांचे स्वागत केले पाहिजे. ज्यांच्याबद्दल आपल्याला आपुलकी, स्नेह, सख्य वाटत नाही, त्यांना सेवा देण्यात आपल्याला आनंद, आदर कसा वाटेल? आधीच सांगितल्याप्रमाणे ग्रंथपालाच्या मनात सर्वच वाचकांबद्दल स्नेहादर असावा. म्हणजे वाचक संख्या घटत जाण्याऐवजी

वाढत राहील.

'अमूक ग्रंथ वाचू नका, अमूकच वाचा' असा अट्टाहास नको तर व्यासंग, अभिरुचीचा आदर व्हवया हवा. ग्रंथालयात वाचकाला किमान शांतता प्राप्त व्हावी, काहीसा विरंगुळा वाटावा अथवा एखादा विचार वाचून बोध व्हावा अशी ग्रंथालयाची व्यवस्था असावी. 'नामा म्हणे थोर ग्रंथ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।। याप्रमाणे ग्रंथपालाने ग्रंथमाहत्म्य लोकांच्या नजरेस आणून द्यावे व ग्रंथांबद्दल श्रद्धा वाढवावी. वाचकांची श्रद्धा, अभिरुची, व प्रकृती, वयोमान पाहून, ध्यानात घेऊन त्यांना उपयुक्त ग्रंथ द्यावेत.

थोडक्यात काय, तर ग्रंथालयात एकच एक साहित्य प्रकार नसावा. तर बालकांसाठी बालवाङमय, स्त्रियांसाठी गृहशोभिका, पाककला इ. प्रकारचे वाङमय असावे. शेतकऱ्यांसाठी शेतीविषयक मासिके ठेवावीत. विद्यार्थ्यांसाठी संगणकावरील काही पुस्तके ठेवावीत, तर वृद्धांसाठी भागवत वैगेरे ग्रंथ ठेवावेत. त्याचप्रमाणे काही विनोदी ग्रंथ व ऐतिहासिक ग्रंथ नववाचकांसाठी व नवयुवकांसाठी अवश्य ठेवावेत. नवसाक्षरांसाठी ही काही साहित्य हवे. म्हणजे ज्याला जे हवे ते ग्रंथालयात मिळेल. कोणताही वाचक आपल्या ग्रंथालयातून रिक्त हस्ते परत जाणार नाही.आज ग्रंथालयाचे स्वरूप बदललेले आहे. सर्वच ग्रंथालयांना एकच अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. सर्वच ग्रंथालयांना एक विशिष्ट तत्त्वज्ञान आहे. सेवेविषयी काही समान नियम, संकेत आहेत.

प्रत्येक ग्रंथालय हे डॉ.रंगनाथन यांच्या पंचसूत्रीवर अधिष्ठित असून असून ग्रंथालयाचा विकास, वाढ, व्याप्ती, विस्तार या पंचसूत्रावर आधारित आहे. ती अशी

<u>पहिले सूत्र</u> :- ग्रंथ हे वाचनासाठी आहेत.

<u>दुसरे सूत्र</u> :- प्रत्येक वाचकाला त्याच्या आवडीचा ग्रंथ वाचायला मिळावा.

<u>तिसरे सूत्र</u> :- प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळावा.

<u>चौथे सूत्र</u> :- वाचकांचा वेळ वाचवावा.

<u>पाचवे सूत्र</u> :- ग्रंथालय हे वार्धिष्णु आहे.

सौ. चंदाराणी माधव कुसेकर
बिल्डींग नं.-२, बचत धाम, श्रीनगर,
वागळे इस्टेट, ठाणे. (प)
दूरध्वनी - २५८१४४१४

## पाहुणा

संस्कृतातील प्राघुण या पुल्लिंगी नामाचा अर्थ पाहुणा 'प्राघुणः' हे 'प्राघुण'च्या प्रथमा विभक्तीचे एकवचनी रूप. प्राघुण आणि पाहुणा या शब्दांच्या उच्चारांतील साम्य लक्षणीय आहे. प्राकृतातील 'पाहुणअ' शब्द हा या दोहोंमधील दुवा. पाहुणा या शब्दाचा प्रामुख्याने रूढ अर्थाचा आशय असा 'आपल्याकडे जेवण्यास वा राहण्यास (अथवा दोन्हीसाठी) मर्यादित काळासाठी आलेली व्यक्ती.' अगदी जवळच्या मित्रास 'पाहुणा' म्हणत नाहीत. त्यामुळेच अशा जवळच्या व्यक्तीला, संकोच करू नकोस. तू पाहुणा आहेस का?' असे म्हटले जाते. अभ्यागत व अतिथी हे दोन्ही शब्द संस्कृतातून आले असून, त्यांचाही अर्थ पाहुणा असा आहे. बोलावलेला पाहुणा व बोलावलेला नसलेला (अनाहुत) पाहुणा या दोहोंनाही अतिथी म्हटले जाते. बोलावले नसताना जो येतो, त्याला आगंतुक असेही म्हणतात. हादेखील मूळचा संस्कृत शब्द आहे. 'अगांतुक' हा त्याचा अपभ्रंश. मुळात 'आगंतुक'च्या अर्थात वाईट छटा नाही; पण त्याचा वापर सहसा चांगल्या अर्थी होत नाही.

# साहित्य शोधः संशोधनातील महत्वाचा घटक

*शास्त्रीय बैठक असलेल्या संशोधनात साहित्य शोध हा फार महत्वाचा टप्पा मानला जातो. त्याबद्दल अगदी थोडक्यात - संपादक*

**प्रस्तावना:-** संशोधन म्हणजे एखाद्या घटनेचा नव्याने घेतलेला शोध. ही प्रक्रिया सतत चालू राहणारी असते. म्हणजेच संशोधन हे प्रगतीचे निदर्शक आहे. अशावेळी नव्यानेच एखादे संशोधन सुरू करताना त्या संशोधन विषयाशी निगडीत पूर्वी काय संशोधन झाले आहे, याची अद्ययावत माहिती मिळवणे, अत्यंत आवश्यक असते. यालाच साहित्य शोध (Literature search) असे म्हणतात.

**संकल्पना:-**

एखाद्या विशिष्ट विषयाशी संबंधित पूर्वी काय संशोधन झाले आहे, याची शास्त्रशुद्ध पध्दतीने (Systematically) माहिती गोळा करणे, म्हणजेच साहित्य शोध होय.

साहित्य शोध हा संशोधनातील अतिशय महत्वाचा घटक आहे. संशोधनास सुरुवात करण्यापूर्वी साहित्य शोध घेतला जातो. त्याचा संशोधनास मोलाचा आधार असतो. संशोधकास आपल्या संशोधनाची व्याप्ती त्यावरून निश्चित करता येऊ शकते.

उदाहरणार्थ:- एखाद्या विषयावर गेल्या दशकातील प्रकाशित ग्रंथांची सूची तयार करायची असेल तर कालखंड निश्चितीसाठी साहित्य शोधाचा फार व चांगला उपयोग होऊ शकतो. त्यापूर्वीची सूची प्राप्त झाल्यास हाती घेतलेल्या विशिष्ट कालखंडातील सूचीमुळे अद्ययावतता राखली जाते व संशोधन विषयाचे समर्थनही करता येऊ शकते.

**साहित्य शोधाची गरज:-**

संशोधनास परिपूर्णता येण्यासाठी, तसेच ते मान्यताप्राप्त होण्यासाठी साहित्य शोधाची गरज असते. याशिवाय आणखी काही कारणे अशी:-

१) आपल्या संशोधन विषयाशी निगडित पूर्वी कोणी संशोधन केले आहे याचा संशोधकाला मागोवा घेता येतो.

२) विशिष्ट विषयावरील अद्ययावत अशी माहिती हाती लागते, जी संशोधनासाठी उपयुक्त असते.

३) विशिष्ट विषयात आपल्या संशोधनाने काय भर पडणार आहे, याचा संशोधकाला अंदाज येतो.

४) आपले संशोधन पूर्वीच्या संशोधनापेक्षा कसे वेगळे आहे, याची संशोधकाला कल्पना स्पष्ट होते.

५) पुढील संशोधनास दिशा मिळते.

यामुळेच, साहित्य शोध ही संशोधनातील प्राथमिक गोष्ट मानली जाते. त्याच्या अभावी संशोधनास पूर्णता प्राप्त होत नाही.

**साधने:-**

हा उपलब्ध अशा सर्व प्रकारच्या साहित्य साधनांतून साहित्य शोध घेतला जातो. संशोधकाच्या संशोधन विषयाशी निगडीत कोणत्याही प्रकारचे मुद्रित किंवा अमुद्रित साहित्य हे शोधाचे साधन असू शकते. प्रामुख्याने खाली नमूद केलेली साधने ही साहित्य शोधासाठी जास्त प्रमाणात वापरली जातात.

**अ) प्रबंध:-** वेगवेगळ्या विद्यापीठांतून वेगवेगळ्या विषयांवर एम.लिब, एम. फिल., पीएच.डी. यांसारख्या

पदव्यांसाठी प्रबंध सादर केले जातात. त्यांचा साहित्य शोधासाठी चांगला उपयोग होतो. अशा मान्यताप्राप्त प्रबंधांची यादी ठरावीक काळाने नियतकालिकांतून प्रकाशित होत असते. उदाहरणार्थ:- University News, ज्ञानगंगोत्री इत्यादी. त्यांचा उपयोग साहित्यशोधासाठी करता येतो.

**आ) ग्रंथ:-** दरवर्षी विविध विषयांवर उपयुक्त असे ग्रंथ प्रकाशित होत असतात. त्यात मौलिक माहिती दिलेली असते. आपल्या संशोधन विषयाशी निगडित असे ग्रंथ संशोधकाला उपयुक्त ठरतात. शिवाय, त्यात शेवटी दिलेली संदर्भ ग्रंथसूची दुसऱ्या अनेक ग्रंथांकडे संशोधकाला खेचून नेते. त्यामुळे संशोधकाच्या अभ्यासाची खोली रूंदावते. ग्रंथाबाबतच्या माहितीसाठी ग्रंथपरीक्षण, समीक्षा, प्रकाशकांच्या सूची इत्यादी साधनांचा आधार घेतला जातो.

**इ) लेख:-** नियतकालिकांतून प्रसिध्द होणारे विविध विषयांवरील लेख हे त्या त्या विषयाची अद्ययावत माहिती पुरवत असतात. संशोधकाला त्याच्या संशोधन विषयाशी निगडित नवीनवी माहिती त्यातून मिळत असते. बऱ्याचदा एकाच विषयावर अनेक ठिकाणी संशोधन चालू असते. संशोधनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवरील निष्कर्ष हे तपासणीसाठी नियतकालिकांतून जाहीर केले जातात. त्यांचा संशोधनासाठी चांगला उपयोग होत असल्याने अशा लेखांचाही शोध घेतला जातो.

**ई) संकेतस्थळ:-** इंटरनेटव्दारा माहितीचा प्रचंड स्त्रोत संशोधकाला उपलब्ध होत असतो. त्यात आपल्या विषयाशी निगडित माहिती पूर्ण लेख (Full Text) स्वरुपात उपलब्ध होत असतात. तसेच, त्यात अन्य स्त्रोतांचाही उल्लेख केलेला असतो. या वेबसाईट साहित्य शोधासाठी उपयुक्त ठरतात. संशोधनात दिनांक नमूद केला जातो.

**साहित्य शोध यादी व संदर्भ ग्रंथसूची:-**

बऱ्याचदा साहित्य शोध यादीची संदर्भ ग्रंथसूचीशी गल्लत केली जाते. पण हे लक्षात घेतले पाहिजे की, या दोन याद्यांत बराच फरक आहे. वरवर जरी त्यांच्यात साम्य आढळत असले तरी त्यांच्यातील बऱ्याच बाबी परस्परांपासून भिन्न आहेत. या बाबी अशा:-

१) साहित्य शोध यादीत फक्त त्याच साहित्याचा उल्लेख असतो. जे संशोधन विषयाशी थेट निगडित असते. तर संदर्भ ग्रंथसूचीत अशा साहित्याचा समावेश असतो की ज्यांचा संशोधकाला संशोधनासाठी उपयोग झालेला असतो.

२) साहित्य शोधातील नोंदीचा संदर्भ ग्रंथसूचीतही वापर करता येऊ शकतो. परंतु संदर्भ ग्रंथसूचीतील नोंदीचा साहित्य शोध नोंदीसाठी वापर करता येत नाही. उदाहरणार्थ:- शालेय ग्रंथालयावर संशोधन करीत असताना या विषयाशी निगडीत साहित्य हे शोध यादीत नोंदवले जाते. मात्र संशोधन पध्दतीच्या विस्तृत माहितीसाठी वाचलेले प्रदीप आगलावे यांचे संशोधन पध्दती व तंत्र हे पुस्तक संदर्भग्रंथसूचीतच नोंदवले जाऊ शकते. साहित्य शोध यादीत नव्हे.

३) साहित्य शोध यादी प्रबंधांच्या सुरुवातीस दिली जाते व संदर्भ ग्रंथसूची ही प्रबंधाच्या शेवटी दिली जाते.

**अभावाचे परिणाम:-**

साहित्य शोध याप्रमाणे संशोधनात अतिशय गरजेचा असतानाही त्याकडे पुरेसा गांभीर्याने पाहिले जात नाही. त्याच्या अभावाचे वाईट परीणाम झालेले दिसून येतात. संशोधनात अपूर्णता जाणवते. एकाच प्रकारच्या कामाची पुनरावृत्ती होत राहते. अनेकदा उथळ माहिती दिली जाते. नोंदी व्यवस्थित केल्या जात नाहीत. त्यामुळे माहिती पडताळून पाहता येत नाही. वेळेचा, पैशांचा व श्रमांचा

नाहक व्यय होतो. यामुळे संशोधनाचा दर्जा खालावतो व ते विव्दानांच्या पसंतीस उतरत नाही. अलिकडे काही विद्यापीठांत प्रकाशाच्या नावाखाली संशोधन करण्याचा जो आव आणला जातो, त्यात हे हमखास दिसते.

सारांश:-

साहित्य शोधाच्या परिपूर्ण वापराने संशोधन दर्जेदार होते. साहित्य शोध ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्याचा व्यवस्थित वापर करणे, हे दर्जेदार संशोधनासाठी आवश्यक ठरले आहे.

संदर्भ ग्रंथसूची

1) Callvery, R.et al. Research Methodology New Delhi: S. Chand, 2003, p.viii, 216
2) Krishnaswami, O.R. and Rangnatham, M., Methodology of Research in Social Sciences, Ed. 2 rev., Mumbai: Himalaya, 2005, p.446.

प्रा. श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये. ग्रंथपाल,
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
दत्तनगर, आयरे मार्ग,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१
भ्रमणध्वनी ९२२४७३४०३८

## मेगाब्लॉक

**मेगाब्लॉक म्हणजे काय?** : मेगाब्लॉकबाबत पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वेची कार्यपध्दती सारखीच आहे; पण त्यासाठी वापरण्यात येणारी यंत्रणा वेगळी आहे.

**'ब्लॉक' मध्ये काय करतात?** : अनुरक्षण आणि देखभाल! खडी दबते, फुटते, त्यामुळे ब्लॉकच्या काळात पावडर बाजूला काढून नवीन खडी टाकली जाते. रुळ तपासणारे पिवळे मशीन रुळावरून फिरवले जाते. पॅकींग, ट्रॅक लेव्हलिंग, खडी दाबणे, दोन ट्रकला वेल्डिंग, ओवरहेड वायरची तपासणी इत्यादी कामे केली जातात. तसेच रुळांची स्थिती, त्यामधील बिघाड, फट,फिशप्लेट, रुळांचा प्रत्येक भाग व्यवस्थित आहे की नाही हे बघितले जाते.

**नियोजन** :यात बरेच विभाग समाविष्ट असतात. कमर्शिअल, इक्विपमेंट, ट्रेन ऑपरेशन, ओव्हरहेड इक्विपमेंट, इलेक्ट्रीकल डिपार्टमेंट, ट्रॅक मेटेनन्स इ. दरवेळी काही भाग घेतात. एकच मार्ग निवडतात (जलद किंवा धीमा). जाणारा किंवा येणारा. निर्णय ऑपरेशन विभाग, ट्रॅफिक विभाग, इलेक्ट्रीकल विभाग.

**ब्लॉकचा काळ-५ तास.** या काळात गाड्या रद्द करतात. वेगावर नियंत्रण आणतात.

**कामाची वेळ** : स्वच्छ प्रकाश म्हणून शक्यतो दिवसा पण बोरिवली आणि विरार (एकच मार्ग) दरम्यानचे काम शनिवार आणि रविवारच्या रात्री करतात. यावेळी एकच मार्ग निवडतात.

निरीक्षक, पदाधिकारी, स्टेशन मास्तर स्वतः लक्ष देतात. रात्रीच्या वेळेत गाड्यांची देखरेख, किती 'पास' झाल्या याची देखरेख आणि चौकशी पर्यवेक्षक करतात.

वरिष्ठ अधिकारी कंट्रोल रुममध्ये लक्ष ठेवून असतात. मिनिटांचा हिशोब करून लोकांची सोय बघितली जाते.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

लेख मालेतील पुढील लेख - संपादक

'भारतीय संस्कृती' ही मानवी समाजाची, या अफाट विश्वातील एक विलक्षण चीज आहे!! ह्या संस्कृतीचा उगम 'वेदीक ज्ञानबीजात' आहे. त्या संस्कृतीचा प्रवाह अंततापर्यंत मार्गक्रमण करणारा जीवनस्त्रोत, चैतन्य प्रवाह आहे. या (मर्त्य) मानवी शरीरांतून या वैश्विक चैतन्यरूपी ज्ञानबीजाची अभिव्यक्ती या पृथ्वीवर, 'भारतभूमी' वरील 'निसर्गसान्निध्यात' विकास पवत आहे. 'भूमी' हा शब्दसुद्धा 'Land' जमीन इतक्या शुष्क भौतिक अर्थाचा नव्हे. चैतन्यबीजाला 'जड सृष्टीत' विस्तारण्यासाठी जो मूळ संपन्न आधार लागतो व ज्यायोगे हे बीज न्यग्रोध व अश्वत्थ वृक्षांमधून (देव वृक्ष), कमलपुष्पासारखे (राष्ट्रीय फूल) फुलते, व गंधर्वसंगीत (धृपदधमार) गाते - त्याचा मुख्य आधार म्हणजे ही भारत भूमी ! हे काही 'अभिनिवेशी' विधान नव्हे!! मॅझिनीच्या 'National Pride' या अहंकारातून केलेले भाष्य नव्हे, तर मानवीसमाजाला खऱ्या अर्थाचा बोध न झाल्याने केवळ विकारी; संकुचित दृष्टीला न समजलेले वैश्विक सत्य आहे. त्यामुळेच, या मानवी जीवस्त्रोत अनंत कालापर्यंत 'जीवन' आधार मिळावा अशा योजनेने हिमालयाची निर्मिती, बर्फाची सतत होणारी वृष्टी व बारा महिने वहाणारा गंगा, यमुना यांचा 'नद्यांस्वरूपांत वहाणारा पवित्र जल प्रवाह' याची जोड आहे. भौतिक पाश्चात्य विज्ञानाला, या सत्यातील केवळ भौतिक Physical स्वरूपे दिसली आहेत, पण त्यामागील रहस्यांचा मागमूसही लागलेला नाही. हे वैश्विक निर्मितीतील गूढ आहे. ही भारतीय संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण आहे. मानवी जीवनांत 'देवी' आहे.

त्यावर पुढच्या मानवी समाजाचा सांस्कृतिक प्रवाह खळखळून वाहू लागला. या संस्कृतीप्रवाहाचा 'कॅनव्हॉस' एव्हढा प्रचंड मांडला गेला आहे, त्याला इतिहासांत तोड नाही. एवढ्या प्रचंड उंचीची संस्कृती या जगाने पाहिली नाही, अनुभवली नाही. 'रामायण, महाभारत' या दोन शब्दांत ज्या संकल्पना व्यक्त होतात त्यांचा विस्तार व आशय अजूनही पूर्णपणे 'आधुनिक मानवाला' पेलू शकत नाही!! महाभारतात तर 'भगवद्गीता' हे काव्य 'वासुदेवाने गेय' गेय 'देव-मानव' भाषेत 'एक अर्जुनाला' 'एक द्वापारयुगात' ऐकवले!! मानवी जीवनाचा सर्वांगीण परामर्ष, ध्येय, दिशा प्रस्तुती, अर्थ व आवश्यक ज्ञान याचा जो विलक्षण पसारा ह्या छोट्याश्या गीतात आहे. त्याला तुलना नाही व त्याला अनंत काळपर्यंतचा संदर्भ दिशा व आशय आहे!! त्याला 'भारतीय संस्कृती, मानवी जीवन, जीवन मूल्ये, वैश्विक सत्यज्ञान, ऋतज्ञान, मानवी उत्क्रांतीची दिशा हे वास्तव आहे!! ' रामायण, हे असेच काव्य ऋषी वाल्मिकी यांना ज्या एका हृदयस्पर्शी घटनेने स्फुरले ते आठवा बरे. 'मा निषाद' या क्रौंचपक्षी द्वयांच्या बद्दलच्या संवेदनाक्षम मनाचा आहे!!

**What is reality in Cultura?**

रामायण व महाभारत हा इतिहास आहे. या संस्कृतीचा!!

सध्याच्या गाजत असलेल्या 'रामसेतू' विषयासंबंधी कुठचे प्रश्न उपस्थित केले जात आहेत?




चित्र १

राम ही व्यक्ती ऐतिहासिक आहे कीं पुराण वस्तू आहे? 'रामसेतू' मानवनिर्मित आहे कीं निसर्गनियमित? या वस्तूंना 'Scienctific Objectivity' 'वैज्ञानिक सत्यता' आहे की नाही?

दुर्दैवाने, या प्रश्नांचा उगम 'सत्य' जाणण्याचा प्रवृत्तींत नाही, तर येत्या निवडणुकांत कुठल्या पक्षाला सत्तेवर यावयाला हवे? या प्रश्नाच्या उहापोहाने, सामाजिक मनात सळवळ माजूक राजकीय सत्याग्रहणाला मदत होईल!! पण, ह्या वैचारिक दिशाहीन चर्चेतही व तिच्या उगमातही एक गूढ दैवी योजना असते, याचा या राजकीय पुढाऱ्यांना मागमूसही नाही किंवा तसा तलास घ्यावा असे वाटत नाही. स्वतःच्या संस्कृतीमूल्यांचा विसर पडलेल्या समाजाला त्याची एक आठवण, भौतिक जीवनातील एखाद्या प्रश्नाने, होईल, ही गोष्ट आहे!! 'This it was or was not' ह्या शीर्षकाच्या इंडियन एक्प्रेसमधील लेखात दि. १८-९-२००७) विवेक देब्रॉय म्हणतात - 'The Ramayan and ther Mahabharat are collectively known as itishasa! The three words iti, ha, asa translate aa thus indeed it was. (इतिहास!!) या तीन संस्कृत शब्दांचा अर्थ 'असे हे झाले' असा आहे.

### सांस्कृतिक इतिहास

पण, या इतिहासात सध्याच्या मानवाला त्याच्या सध्याच्या ज्ञान किंवा तर्क पद्धतीत बसणाऱ्या घटना किंवा थोडेसे पुढे जाऊन त्याच्या स्वार्थी, व्यवहारी व भौतिक मनाला या 'इतिहासातील जीवनमूल्येही फार दूरची, दुर्गम किंवा, अप्राप्य, अस्वीकारार्ह वाटल्याने त्याची नैसर्गिक प्रवृत्ती हा 'इतिहास नाकारण्याकडे'आहे.

या इतिहासातील वर्णन केलेल्या घटना, प्रसंग हे सर्व नाकारण्याची 'मूल्यधारणा' कोणती?

- 'माणूस एकपत्नी' राहू शकेल कीं नाही? रहावे का?

- विवाहाचा सत्य अर्थ काय आहे?

- पित्याने आईला दिलल्या वचनपूर्तीसाठी राजपुत्राने १४ वर्षे वनवास पत्करावा का?

- स्वतःला चालून आलेले राज्यपद नाकारुन केवळ खऱ्या वारसदाराच्या 'पादुका' सिंहासनावर स्थापून राज्य करावें का? असा स्वार्थत्याग व समर्पण करणारी वृत्ती शक्य कोटीतली आहे का?

स्वतःच्या राजपदावरील पत्नीवर बिनबुडाचा चारित्र्यहननाचा आरोप करणाऱ्या एखाद्या सामान्य नागरिकासाठी तिला 'अग्नीपरिक्षा' करावयाला उद्युक्त करणारी संवेदनाक्षम अशी 'राज्याधिकारी व्यक्ती' मानवी व्यवहारात संभवू शकते का?

त्याच रोखाने मग लंकेवर स्वारी करुन व रावणाचा पराभव करुन त्या प्रदेशाला आपल्या राज्यात सामील करण्याचा 'जगन्मान्य' प्रस्ताव टाकून देऊन त्या राज्यावर रावणाच्याच भावाची स्थापना करणे हे कुठले

व्यवहार्य धोरण? अयोध्या व लंका हा लढा कुठल्या प्रतीकांचा? असे, मग सरतेशेवटी लंकेकडे जाण्यासाठी जी युक्ती, योजना वापरली ती सत्य घटना आहे का? तिला लागणारी टेक्नॉलॉजी (व लल्लूप्रसाद म्हणाले ती इंजिनियरिंगची डिग्री) नसताना कशी विश्वासार्ह मानता येईल?



चित्र २

-भौतिकवादी मनाला भौतिक वस्तू व पुराणे Mythology यांचा संबंध बादरायणी वाटतो!! Is Myth a Mumbo-Jumbo? हे असे अनेक विषय मनात गर्दी करू लागल्यावर हा इतिहास नसेल तर ही एक 'पुराणकथा' (Myth) 'Mythology' आहे असा निष्कर्ष ह्या युगांतील विचारवंतांनी स्वीकारला आहे. त्या संदर्भाकडे दुर्लक्ष करणे व त्यांतील 'सत्याकडे' अविश्वासाने पहाणे हे व्यवहार्य मानले आहे!! आणखी कोणते मुद्दे उपस्थित होत आहेत?

"Rubbish, realists would say. Life is about progress, not supersititious and mumbo-jumbo. Trouble is, how 'real' or progressive, is progress?

बंडूला सत्याचा मॅनिया झाला.

जुग सुरैय्या हे 'Speaking Tree' या ता. १५-९-२००७ च्या टाइम्समधील कॉलममध्ये लिहीत आहे...

"Perhaps the real and the hyper real are inextricable components of the same merry-go-round. As a modern Scientist put it.

"Reality is what we take it to be true. What we take to be true is what we belive. What are believe is based upon our precepts. What we perceive depends on what we look for. What we look for depends on what we oerceuve deternubes wgat we believe. What we believe determines what we take to be true what we take to be true is our reality."

जुग सुरैय्या यांनी एका आधुनिक वैज्ञानिकाचे भाष्य सांगितले नाही. (अव्रू वाचली!) पण, सध्याच्या वैज्ञानिक, सामाजिक व राजकीय विचारवंताच्या मानाचा 'मेरी गो राऊंड गोंधळ' व्यक्त करणारा उतारा सांगून मदत केली आहे. वैश्विक 'सत्य' जगण्याची Intellectual बुद्धिवादी प्रक्रिया सांगितली आहे. काय आहे हे 'मेरी गो राऊंड'

'वास्तव म्हणजे जे आपण सत्य मानतो. सत्य कोणते तर ज्याच्यावर आपण विश्वास ठेवतो-विश्वासार्ह मानतो. आपण विश्वास कशावर आधारतो? तर, जे मान्य प्रचलित शिकवणीवर, आधार, नियम, रीतीरिवाज असतात. ते होय.' आपण कोणते आधार शोधतो तर ज्यांचा आपण शोध घेतो. आपण कशाचा शोध घेतो तर जे आपल्याला दिसते ते आपण विश्वासार्ह मानतो. जे आपण विश्वासार्ह मानतो ते आपले 'सत्य' असते. जे आपण सत्य मानतो तेच खरे वास्तव असते. 'झाली आपली फेरी-विश्वासाची, सत्यतेची, वास्तवाची- पण ती जिथून सुरु झाले तिथेच पोंचलो!! काय गंमत आहे.!! ' ही तर्कपद्धती म्हणजे टी.व्ही. वर जाहिरात येते 'बंडूला मॅनिया झाला रे' ह्या धर्तीची, दुसरे काय?

वेदिक ज्ञानपद्धती सत्य व गहन

या तुलनेने भारतीय संस्कृती 'सत्य व ऋत' यांचा काय शोध घेते? भारतीय संस्कृतीची सुरुवातच मुळी अत्यंत उच्च तर्कपद्धतीने झाली. नासदीय सूक्त, पुरुषसूक्त,


अस्यवामीय सूक्त, ईशवास्य उपनिषद, केनोनिषद, कठोपनिषद, प्रश्नोपानिषद, मुंडकोपनिषद, श्वेताश्वतरोपनिषद, तैतरिय उपनिषद, ऐतरेयउपनिषद वगैरेंनी झाली व भगवद्गीतेत त्याची समन्वयी संहिताही प्राप्त झाली. पण, 'या वैज्ञानिकाच्या (जुगसरैय्या कथित)' तर्कपद्धती सारखी ही वैदिक ज्ञानपद्धती Vedic Epistemology नव्हती तर 'सत्य' व 'ऋत' ह्याचा शोध मानवजातीच्या इतिहासांत प्रथम घेऊन त्याचा विश्वनिर्मितीशी जो अतूट संबंध आहे तो 'वेदांच्या ज्ञानपद्धतीने' व दिशेने शोध घेण्यात आला!!

### इतिहास का, त्याचे प्रकार

प्रथम हा विचार केला पाहिजे कीं इतिहास का लिहायला हवा? इतिहास कोणत्या गोष्टींचा आवश्यक? दिशा कोणती? कॉलेजमध्ये शिकवला जातो त्याची भलावण - 'युद्धे व सनावली' अशी केली जाते. 'बखर' हा एक आणखी प्रकार!! यात जागतिक प्रवास करणारे त्यांनी केलेली वर्णने पहावयाला मिळतात.

कार्ल मार्क्स ह्याने 'भौतिकवादाचा इतिहास - तीन पद्धतीने केला. Historical materialsm, Dialectical materialism व Scientific materialsam मानवी समाजाचा प्रवास हा त्याच्याConsciousness चैतन्यशक्ती, त्याची अभिव्यक्ती व त्या समाजाने जी सांस्कृतिक मूल्ये संपादन केली त्याचे प्रदर्शन व अभिव्यक्ती दाखविली, त्याचा आहे. स्वतःच्या अस्तित्वाचा अर्थ, विश्वाच्या निर्मीतीचा, व्यवहाराचा अर्थ ज्या साक्षीदाराच्या भूमिकेतून लावला त्याचाही इतिहास आहे. ह्या अफाट विश्वाला 'माणूस' हा साक्षीदार लाभला आहे. पण हा साक्षीदार सुद्धा युगायुगाच्या कालक्रमणेमध्ये बदलत गेला आहे आणि त्या बदलाचा साक्षीदार हे विश्व व इतर जीवन तसाच ईश्वरही आहे. ह्या मानवाची ही वाटचाल कित्येकदा अडखळत, चुका करत, हिंसा करत व उच्च मानवी मूल्ये शोधत शोधत चालली आहे. शिवाय, हा मानव-स्वतःच्या मर्त्य शारिरीक अस्तित्वाच्या जाणिवेतून 'अमृतपुत्र' या खऱ्या सत्य आदर्शवादी अस्तित्वाच्या जाणिवेकडे प्रवास करतो आहे हा ह्या प्रवास आहे - त्याचा इतिहास 'काळाच्या' सोनेरी अक्षरात लिहिला जातो आहे. हो 'Brief History of Time (Stephen Hawking) नाही तर अनंत काळच्या जीवनाचा अत्युच्च बिंदू शोधण्याचा प्रवास आहे!! त्यामुळे अशा वैश्विक स्वरुपाच्या भारतीय मानवी संस्कृतीचा इतिहास कसा लिहावयाला हवा?

**कॉ. श्रीपाद अमृत डांगे - विवाह संस्था भाष्य**




चित्र ३

मार्क्सवादी हे भौतिकवादी तत्त्वज्ञान आहे. त्यांनीसुद्धा भारतीय संस्कृतीचा इतिहास लिहावयाला घेतला. कॉ. डांगे यांनी इतिहासाचार्य राजवाडे यांच्या विवाह संस्थेचा इतिहास या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली. त्यांत पुरुष व स्त्री यांचा संबंध सामाजिक अर्थाने बांधणारा विवाह चर्चिला आहे. सामाजिक उत्पादनाच्या प्रक्रिया जशा बदलत गेल्या

तशा भारतीय विवाह संकल्पना बदलत गेल्या असा अर्थ दाखविण्याचा प्रयत्न केला. ह्या अर्थाला 'अर्धसत्य' असे नक्कीच संबोधावे लागेल.

पण, महायोगी अरविंदाना काय दिसले ते त्यांच्याच शब्दात पहा.

योगी अरविंद व सोम-सूर्य विवाहाचे प्रतीक

'If we look at the beginnings of Indian Society, the far-off Vedic age, which we no longer understand, for we have lost that mentality, we see that every thing is Symbolic.

The religious institutions of Sacrifice (यज्ञ) governs the whole Society and all its hours and all its hours and movement and the ritual of the Sacrifice is at every turn and in every detail as even yet, the whole sense of the hymn turns about the successive marriages of Surya, daughter of the Sun, with different golds and the human marriages is quite a Subordinate matter over shadowed and governed entirely by the divine and mystic figures and is spoken of in the terms of that figures.

This symbolism influenced for a long true Indian ideas of marriage and is even now conventionally remembered though no longer understood or effective."

श्री. अरविंदासारखी व्यक्ती 'विवाह'-स्त्री-पुरुष संबंध यांचा अर्थ लावण्यासाठी वेदांकडे वळू शकते. ज्या व्यक्तीचे शिक्षण इंग्लंडमध्येच व ब्रिटीश संस्कृतीच्या संपूर्ण प्रभावाखालीच मुद्दाम योजण्यात आले त्या व्यक्तीला विवाह संकल्पनेत 'Spiritual Reality' 'अध्यात्मिक सत्य संकल्पना' दिसली व त्याचा आधार ऋग्वेदातील 'सूर्या-विवाह' या सूक्तात गवसला. मग, तो शोध भारतीय कम्युनिष्ट पार्टीच्या अत्यंत प्रगल्भ बुद्धीच्या व राष्ट्रीय चळवळींत लोकमान्य टिळक यांच्या आदर्शाला मानणाऱ्या म्हणजे कॉ. श्रीपाद डांगे या व्यक्तीला का घ्यावासा वाटला नाही? त्यांच्या नावातही 'श्रीपाद व अमृत' असे दोन शब्द का आले आहेत?

ह्याचे कारण उघड आहे. युरोपियन भौतिकवादी तत्त्वज्ञानाला सत्य मानणाऱ्या व जीवनमूल्यांची निर्मिती व बदल 'Class Struggle' व magteniastic Progress, Changing means of Production and Corresponding Social Change ह्या विचार प्रवाहाला सत्य मानणाऱ्या विचारवंतांची ही कहाणी आहे. इतिहासाकडे बघण्याचा हा एक सांप्रदायिक Parading बद्ध विचार आहे. मूळ सत्याचा शोध व प्रवाह नव्हे!!

इतिहास हा 'सत्याचा शोध', जीवन मूल्याची गुणात्मक उत्क्रांती, वैश्विक आदर्शांची रचना व अंमलबजावणी वगैरेंची असावयाला हवी.

इतिहास म्हणतो- सामान्य जीवनाची बखर नव्हे!! ती तर 'आहार, निद्रा, भय व मैथुन' ह्या चतुरस्त्री ब्रीदांत, एक 'पशुजीवन' म्हणून अगोदरच वर्णन करून ठेवली आहे.

भौतिकवादी चष्म्यातून इतिहास

या पार्श्वभूमीवर भारतीय संस्कृतीतील इतर भौतिकवादी इतिहासांचा परामर्श जरुर घेता येईल. कॉ. देवीप्रसाद चटोपाध्याय यांचा 'Lokayat' लोकायत हा ग्रंथ व त्याचे श्री. स. रा. गाडगीळ यांनी केलेले रुपांतर, Dr. Abid Hussein यांचा Indian Nationalisim हे पुस्तक वगैरे. वगैरे!! पण, कॉ. डांगे यांची राजवाडेच्या पुस्तकाची प्रस्तावना का निवडली? तर, ती इतिहास म्हणजे मानवी जीवनाची वाटचाल कुठल्या भिंगातून पहावी व पाहिली जात आहे त्यावर चिंतन करण्यायोग्य आहे म्हणून!! कॉ. श्रीपाद अमृत डांगे ज्या गोष्टी सांगत आहेत, त्या भारतीय संस्कृतीच्या आधुनिक स्वरुपांत 'विवाह' किंवा स्त्री-पुरुष संबध ह्यांचा सामाजिक संदर्भ व त्याचा मार्क्सइझम या तत्त्वज्ञानाच्या प्रकाशात होणाऱ्या बदलांचे अर्थ व कारणे

सांगत आहेत. थोडक्यात त्यांच्या म्हणण्याचा आशय एव्हढाच आहे की ह्या देशांत पुराण काळापासून आजपर्यंत जो उत्पादन क्षेत्रांत बदल झाले त्याला अनुरुप असे बदल स्त्री-पुरुष नात्यांत व भारतीय संस्कृतीचे जे वैशिष्ट्य 'एकत्र कुटुंबपद्धती' त्या क्षेत्रातही झाले. ह्याचा अंतिम टप्पा म्हणजे कॉ. डांग्यांनी पाहिला नसलेला वृत्तांत म्हणजे विभक्त कुटुंबपद्धती, घटस्फोट 'गे' वृत्ती (Gay Rrlations) लिंग बदल व स्त्री-पुरुष ह्यांच्या व्यक्तिगत व सामाजिक नात्यांमधील संघर्ष.

### कॉ. डांगे यांचे अर्धसत्य

जर, कॉ. डांगे ह्यांच्या 'गणिती फॉर्म्युलाचाच' पराभव किंवा सत्यता पाहू गेल्यास त्यांचा थिवरम हे एक 'अर्धसत्य' आहे हे मानावेच लागेल.

पण, ह्याचा निष्कर्ष 'प्रोग्रेस', 'प्रगती', ह्या निपकावर लावावयचा झाल्यास आदिवासी, वनवासी, ट्रायबल स्थितीतून जमीनदारी व आनंद भांडवलदारी राज्यावस्थेत संक्रमण होता होता स्त्री-पुरुष संबंध हे Harmoneous समन्वयी, परस्पर प्रेमाचे न रहाता उध्वस्त, संघर्षात्मक नात्यांमध्ये येऊन ठेपले आहेत. हा कॉ. डांगे यांच्या थियरमचा विजय व स्त्री-पुरुष संबंधाचा पराभव मानावा लागेल.

आणि एवढ्यावरच ही पडझड न थांबता वैश्विक नाते संबधात स्त्री-पुरुष हे 'सूर आणि असूर' Classical Couflict म्हणजे 'भांडवलदार'- कामगार या क्लासिकल कॉनफ्लिक्ट वर्ग विरोध विकासाच्या फॉर्म्यूलांत Mutual destruction ह्या सीमेवर भीषण संग्रामात उभे आहेत. ही प्रगतीची व्याख्या एकांगी दर्शनाची होय.

### वेदिक दृष्टिकोन विश्वनिर्मीतीचा

मुळात स्त्री-पुरुष ही भिन्न लिंगी मानवी रूपांची निर्मीती का झाली. त्यांत विश्वाचा हेतू व यंत्रणा कोणती? त्यांच्यात परस्पर आकर्षण का आहे? गुरुत्वाकर्षण ह्या न्यूटनच्या शोधासारखे? त्यांच्यात मैथुन ही क्रिया कोणत्या दोन गोष्टी दर्शवते? नवजीवन निर्मिती व परमसुखाची प्राप्ती इतर जीवसृष्टी उद्बीज अंडज, स्वेदन ह्या जीवनिर्मीतीच्या मुलगामी यंत्रणेपासून 'मैथुन' ह्या यंत्रणेपाठी का आली? ह्या क्रियेची प्रेरणा ही परम सुखाची आहे का? त्यांत 'सोम' ह्या संकल्पनेचा प्रभाव जे ऋग्वेद सारखी वेदीक भाष्ये सांगतात ती क्रिया किंवा शास्त्र कोणते?

पण, पाश्चात्य तत्वज्ञानाच्या 'सत्य कथनाच्या' प्रक्रियेवर विश्वास ठेवणाऱ्या व मेकॉले व इतर ब्रिटीश शिक्षण अधिकाऱ्यांनी उध्वस्त केलेल्या भारतीय संस्कृतीतील त्या अत्यंत मूलगामी ज्ञानाबद्दल अविश्वास दर्शविणाऱ्या त्या विचारवंतांना, असे Fundamental Quesetions पडत नाहीत असेच दुर्दैवाने दिसत आहे.

पण ह्या उलट भारतीय संस्कृतीची आधारभूत 'भूमी' वर व वेदीक संस्कृतीतील ज्ञानाचा वारसा सांगणाऱ्या भारतीय समाजाची- म्हणजे ह्या पृथ्वीवर आज जिवंत असणाऱ्या भारतीय मानवाची स्थिती इतकीच दुर्बल, हतबल, अज्ञानी व विस्कळीत 'श्रध्देची बनली आहे. त्याला ह्या सर्व प्रश्नांची अत्यंत सखोल, संपूर्ण व तर्कशुध्द उत्तरे आपल्या शास्त्रांत, तत्त्वज्ञानात, तंत्रात व इतर ज्ञानांत उपलब्ध आहेत. हे एकतर माहीत नाही, किंवा त्या ज्ञानपद्धतीवर त्याचा विश्वास हरावला आहे. कारण, तो सध्याच्या एकांगी भौतिकवादी पाश्चात्य ज्ञानसंस्कृतीचा 'प्रॉडक्ट' आहे!

मग काय आहेत ह्या गूढ मूलगामी प्रश्नांची उत्तरे ते थोडक्यात पाहू या

Vedic struetural Canfiguration वेदिक सृष्टीरचना

हे पहाण्यासाठी व अनुभवण्यासाठी प्रथम ह्या

ज्ञानक्रियेची रचना व तंत्र काय - हे जाणून घ्यावे लागेल. त्याचे ज्ञान नसल्यास ह्या ज्ञानाची रूपांतरे चढत्या स्तराने केवळ यांत्रिक किंवा Mechanical पध्दतीनेच होऊ शकतील. पण, त्यांची पातळी व क्षमता उंचावल्याखेरीज विश्वरचनेच्या मूळ बीज स्तरावर जाता येणार नाही. पण, इथे जाण्याचाच प्रयत्न व साधना महायोगी अरविंद यांच्या Super Consciousness च्या प्राप्तीचा होता व तो त्यांना व्यक्तिगत प्राप्त झाला आणि त्याचे संक्रमण आता भौतिक स्तरावर मानवाला प्राप्त होऊ शकेल असा त्यांचा दावा होता. ज्या दिवशी ही विशेष प्राप्ती झाली त्याला 'Victory Day' म्हणून तो दिवस पाँडिचरीला साजरा करतात. संबंध मानव जातीचा ह्या आध्यात्मिक लढाईतील हा विजयाचा दिवस होय. 'सावित्री' हे महाकाव्यसुद्धा मृत्यूवरची मात हेच दर्शविते!!

वेदातील स्त्री-पुरूष नाते



चित्र क्र. ४

आपला विषय स्त्री-पुरुष संबंध व नात्याचा आहे. ह्याबद्दल सविस्तर लेख मी 'दिशा' च्या ऑक्टोबर २००५ च्या अंकात छापला आहे.

काय आहेत त्यातील महत्त्वाचे मुद्दे?

१) विश्वाच्या निर्मितीत मानवी शरीर Human from ची निर्मिती 'अर्ध नर-नारी' ह्या संकल्पनेवर झाली.

२) ह्या लिंगभेदाच्या यंत्रणेवर आधारून 'भौतिक जगात' पृथ्वीवर नवीन जीवशरीर, मानवी रूपांत जन्म पावते. ती क्रिया छांदोग्य उपनिषदांत 'पंचाग्नी' पध्दतीने तीन अग्निहोत्र-अव्यक्त जगात व दोन-भूतलावर-पुरुष व स्त्रीयांच्या मैथुनी क्रियेने होतात.

३) नवीन जीव निर्मिती उद्‌बीज, अंडज, जरायुज, स्वेदज वगैरे पण मानवी जीवनिर्मीती मैथुन क्रियेत होते.

४) ह्या मैथुन क्रियेत 'सोम' रसाचा आनंद युगुलाला प्राप्त होतो.

५) ह्या लग्नाची उच्च स्तराबर 'विवाह' ही संकल्पना आहे. योग्य वधुवर निवड ही काही आध्यात्मिक संकल्पनांवर आधारून होते, त्यांत गण, गोत्र, व ज्योतिषशास्त्र वगैरेची मदत आहे. ह्या आदर्श विवाह दांपत्याच्या मीलनातून दोघांनाही 'अध्यात्मिक' स्तरावरील अधिकार प्राप्त होतात.

६) ह्या निसर्गाने नियमित स्त्री-पुरुष संबंध जो वीर्य, रज, ओज ह्यांच्या क्रिया व धर्म निदर्शित करतो त्याचा भौतिक स्तराबर नवीन जीव निर्मिती हा जरी हेतू व विनियोग असला तरीही त्याखेरीज ह्या संबंधातून आध्यात्मिक क्रियेचा व साधनेच्या ज्ञानाची देखील पूर्ती होऊ शकते. उर्ध्वरेत क्रियेने यज्ञ क्रियेने मानवी स्वरूपांत असलेल्या यज्ञ क्रियेने-सोम रसाची प्राप्ती होते. ह्या क्रियेने आत्म्याच्या उन्नतीचा मार्ग खोलू शकतो.

वेदीक ज्ञानभांडाराचे पुरावे

हे आता मी सूत्र रूपाने सांगितले. ह्या ज्ञानाचा आधार व पुरावा कोणता?

१) ऋग्वेद-सूर्या सोम विवाहः R.V. 10.85. (1-47) (सातवां अनुवाक्)

२) सिध्दान्त कौमुदी- संज्ञाप्रकरणः

३) मालविका-अग्निमित्र-गणदारू-बकुला संवाद

४) छांदोग्य उपनिषद- (६.३) पंचाग्निविधा

५) योगशिखोपनिषद (५-२८-२९), (३२,३३)

६) ध्यान बिन्दुपनिषद (८६-८९)

७) भृगीता अ. १५ (१३)

८) विदूरनीती महाभारत (द्वारियी लोके सूर्यमणूल मदिनो परिवार योग युक्तश्च रणे चाभिमूखे हतः।

मी आणखीही पुरावे देऊ शकेन, पण सध्या आपल्याला एव्हढेच लक्षात दयावयाचे आहे की भारतीय संस्कृतीत, वेद, उपनिषद, नाट्य, कला, तंत्र ह्या सर्व पसरलेल्या ज्ञानभांडारात ह्या जीवनाभिमुख आधारांची एकवाक्यता दिसते, याचा अर्थ हे ज्ञान समाजाच्या अनेक अंगातून मान्यता पावलेले होते.

हे ज्ञान मग लुप्त का झाले? कालाय तस्मैनमः? नगे!! त्याची कारण मीमांसा उपलब्ध आहे!! याला उत्तम उदाहरण म्हणजे अॅटम बॉम्ब निर्मिती करितां कुठल्या पध्दतीचे ज्ञान, शिक्षण, तंत्रज्ञान, त्याला लागणारे Fuel प्लुटोनियम, थोरियम, समाजाची उत्पादनपध्दती ह्याचे साहित्य लागते. चंद्रावर जाण्यासाठी रॉकेट, स्पेस स्टेशन वगैरची योजना लागते? कॉम्प्यूटरस, किती तंत्रज्ञ, किती पैसा, कोणती राज्यव्यवस्था, कोणती अर्थनीति लागते याचा विचार करा. मग यापैकी कुठलीही यंत्रणा बिघडली किंवा अकार्यक्षम झाली तर ही किमया होणार नाही. तेव्हा वेदाच्या ज्ञानपध्दतीतही काही मूलभूत भूमिका आहेत. त्या समजून घ्यावयाला हव्यात.

एकतर जो जीव ह्या पृथ्वीतलावर जन्माला येतो तो पशुस्थितीत असतो. त्याला वैश्विक रचनेची, खगोल सृष्टीची अव्यक्त जगाची, नाद व स्पंदगारआची ज्ञान परंपरा द्यावी लागते.

ती जाणण्याकरिता व आत्मसात करण्याकरिता ह्या मानवी शरीराला सुसंस्कृत करावे लागते. होय! पाश्च्यात्य ज्ञानाच्या पसाऱ्यात ही नैतिक आवश्यकता भासत नाही कारण तिथे जड शरीर, जड यंत्रे, जड द्रव्ये यांजकडून व्यवहार केला जातो. पण, आध्यात्मिक ज्ञानाच्या प्राप्तीकरीता हे मानवी शरीर त्याच्या आत्मा, मन,हृदय, अंतःकरण, जड शरीर या सगळ्यांना चैतन्यपूर्ण, नादानुकूल, नीतीमान, जागरण, ध्यान, धारणेपासून योगसाधनेतून काही अधिकार मिळवावे लागतात. ह्या यादीने दडपून जायचे कारण नाही. पण हे कठीण का वाटते तर हे शिक्षण देणारी समाजव्यवस्था समूळ नाहीशी करण्यात आली आहे व ह्या ज्ञानावरचा विश्वास व श्रध्दा पार उपटून टाकण्यांत आला आहे. आपण, जर भारताच्या वेदिक काळातील इतिहासाकडे गेलात तर ह्याची खात्री पटेल.

पुढील अंक दिशेचा

ह्याचे एकच उदाहरण म्हणजे 'सोम' व 'वज्र', कुंडलिनी जागरण, (Serpond Power Sir John Wordrof) ह्या संकल्पना आज अज्ञान वा दुर्लक्ष का झाल्या? याचे काही तोडके-मोडके ज्ञान आजही तुरळकपणे अस्तित्वात आहे व अत्यंत जबाबदार मंडळी ह्या ज्ञानाची ग्वाही व साक्ष देण्यास तयार आहेत. पण समाज मात्र ह्या ज्ञानाला विन्मुख आहे. तेव्हा ह्या तुरळक ज्ञान पध्दती कोणत्या त्या पुढील लेखात पाहू या.

यशवंत साने
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे - १
दूरध्वनी क्र: २५३६८४५०,
ई-मेल yrsane@eth.net

# प्रश्नांचे बाण

*माणसाला किती कोणते प्रश्न व का पडावेत, याला कोणतेही तर्कशास्त्र नाही. मात्र हे प्रश्न आपला अभिमन्यू करतात हे खरं - संपादक*

असं म्हणतात की चोवीस तासाच्या एका दिवसात माणसाच्या मनात ६०,००० विचार येतात. एवढंसं मन पण या विचारांच्या लहरींनी कधी आनंदित होतं, तर याच लाटांमध्ये उध्वस्तही होतं. विचार कोणते आहेत या पेक्षा परिस्थितीशरण व क्षणसापेक्ष माणसाच्या जीवनाच्या वळणावर विचारांचे चांगले वाईटपण अवलंबून असते. आता असंही म्हणतात, की माणूस चांगला किंवा वाईट नसतो तर त्याचे विचार, प्रवृत्ती चांगल्या वाईट असतात. असं काही सांगणारे तत्त्ववादी माणसं भेटली की ते असं कसं करतात हेच कळत नाही. "विरोध त्या माणसाला नाही त्याच्या वृत्तीला आहे" असं सांगत तावातावाने बोलणारी माणसं "माझं प्रेम तिच्या / त्याच्या आनंदी वृत्तीवर, विचारांवर आहे, तिच्या किंवा त्याच्यावर नाही" असं सांगताना पाहिलीत तुम्ही?

भीष्माला बाण लागता लागता इतके बाण त्याच्या शरीरात घुसले की बाणांच्या शय्येवर घायाळ होऊन पडला, हे महाभारत आपल्याला माहीत असतं. आल्याला असंही असतं माहीत, की भीष्म कोसळला तेव्हा दक्षिणायन होत. उत्तरायणाची वाट पहाणं भाग होतं. दोन आयनांपैकी संक्रांतीला उत्तरायण लागतं. तप:सामर्थ्याच्या जोरावर भीष्मासारखी अधिकार प्राप्त, सिद्धी प्राप्त झालेली माणसं मनावर व प्राणांवर इतका ताबा मिळवत असत की आपल्याला इच्छा होईल या चांगला मुहूर्त असेल तेव्हाच देहत्याग करीत. प्राणांना अडवून ठेवत.

अशा भीष्माच्या मनाच्या आणि मन व शरीर एकच असल्याने (चेतातत्त्व) एकंदरीतच अस्तित्वाच्या म्हणून काही वेदना असतील. प्रत्यक्ष महाभारतातील संदर्भ वेगळा असला तरी, वेदनांचे अस्तित्व, माझ्या कल्पनेत येते तेव्हा जीवाची तगमग होते, काहिली होते म्हणजे काय ते जाणवायला लागतं. कोणीतरी, सामान्य माणूस म्हणून आपल्यालाही ही असामान्य शिक्षा ठोठावली आहे. आणि स्वाभाविकच आपण वेदना सोसणारे असहाय्य भीष्म झालो. भीष्म ज्या शय्येवर पहुडले होते ती शय्या बाणांची होती. आपल्या नशिबी बाणांच्या ऐवजी प्रश्नांची टोके आहेत तगमग नुसती. क्षणाक्षणांचे चक्रव्यूह आणि त्यात घुसमटत रहाणारे अभिमन्यू! आदिमानवाच्या युगात बाणांवर चेहरे टोचून (प्रतिटोळीतील युद्धात जिंकलेले) अग्नीभोवती नृत्य करीत; हे चित्र आठवलं की, ज्या चेहऱ्यांना बाणांची टोके टोचली आहेत टोकं, ते चेहरेही आपलेच होतात.

म्हणून प्रश्नांच्या बाणांवरचे भीष्म! प्रश्नांची क्षेत्रं, प्रश्नांची स्वरूपं, प्रश्नांचे क्षणाक्षणाला होणारे सूर्योदय आणि सामान्य अस्तित्व आपलं! आयुष्याला व्यापून रहाणारे हे प्रश्न कोणतेही असू शकतात. उत्तरांच्या शक्यता असतात हे विसरून, आपण सहन करायचे प्रश्नांचे बाण आणि मनातल्या मनात उमटतात ते पडसाद रहायचे ऐकत-

मनाधीश जो देश प्रश्नी असावा
प्रश्नारंभ आरंभ तो निरुत्तरांचा

प्रा. मोहन पाठक

ठाणे.

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

❖ प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मा. सौ. कल्याणी रघुनाथ वाघरे यांना 'आदर्श शिक्षिका' या महापौर पुरस्काराने गौरविण्यात आले. शिक्षक दिनाला गडकरी रंगायतन येथे शिक्षण मंडळ महानगरपालिका ठाणे यांच्या समारंभात सौ. वाघरे बाईंना मानाचा असा 'आदर्श शिक्षिका' महापौर पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल श्रीफळ, मानपत्र व सरस्वतीची प्रतिमा असे पुरस्काराचे स्वरुप आहे. विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य सर्व विभागांचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांनी बाईंचे अभिनंदन केले.

सौ. वाघरे १९७५ ते २००५ पर्यंत शाळेत सहाय्यक शिक्षिका या पदावर कार्यरत होत्या. २००५ पासून त्या मुख्याध्यापिका या पदावर कार्यरत आहेत.



सौ. कल्याणी वाघरे

त्या मुख्याध्यापिका असताना शाळेचा अमृत महोत्सव साजरा झाला. वर्षभर विद्यार्थी उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करून ते उत्तम रीतीने संपन्न केले.

त्या नेहमी हसतमुख असतात, मनमिळाऊ स्वभावाच्या आहेत. त्यांना प्रवासाची, निसर्गरम्य ठिकाणे पाहण्याची व आलेले अनुभव इतरांना सांगण्याची खूप आवड आहे.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

❖ मराठी विज्ञान परिषद ठाणे, आयोजित विज्ञान सहलीत शाळेतील इ. ९ वी तील २० विद्यार्थी सहभागी झाले. २९ सप्टेंबर रोजी भिवंडीजवळील पिसे डॅम व पांजरपोळ येथे विद्यार्थांना डॅमचा इतिहास, रचना, वैशिष्ट्ये व क्लोरिनेशन प्लेट दाखविण्यात आले. विद्यार्थ्यांनी पांजरपोळ येथे श्री. शेलवलेसर यांच्यासह जलशुद्धीकरण केंद्रास भेट दिली. ई. टी. व्ही वरील 'आपली माणसं' या श्री. मंदार देवस्थळी यांच्या मालिकेत कु. रश्मी अहिरे (६ क) हिने शालेय गणवेशात भूमिका सादर करून शाळेला सन्मान प्राप्त करून दिला. तसेच 'चार दिवस सासूचे' या मालिकेत व फ्रुटीच्या जाहिरातीतही ती बालकलाकार म्हणून झळकली.

❖ स्त्री कल्याण संघटना, ठाणे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत इ. ५ वी, ६ वी च्या गटात श्रीहरी मुळगुंद (६ ब) यास प्रथमक्रमांकाचे व प्रणिता काळभोर (५ अ) हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

❖ माध्यमिक शालासमूहाच्या सहशालेय उपक्रमांतर्गत दि.१३ ऑक्टो. रोजी शिक्षकांसाठी एकपात्री अभिनय स्पर्धा आयोजित करण्यात आली. श्री. वझे, सौ. दांडेकर व सौ. कारंडे-जोशी यांनी कलागुणांचे सादरीकरण केले. यात सौ. कारंडे-जोशी यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

❖ १० ते २१ ऑक्टो. या नवरात्रीच्या कालावधीत देवीची विविध रूपे, साडेतीन पीठे यांची माहिती देणारा कार्यक्रम "स्टार माझा" या वाहिनीवर सादर केला पुराणकाळापासून वेदातील विद्वान स्त्रिया,

आधुनिक काळातील कर्तृत्ववान स्त्रिया या दुर्गेच्या रूपांची सौ. मीरा लिमये यांनी या कार्यक्रमातून प्रबोधपर माहिती सांगितली.

- शारदोत्सवानिमित्त सर्व विद्यार्थ्यांसाठी 'आरती तबक सजावट' स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेवून विविध प्रकारे तबकांची सजावट केली.

- वर्ल्ड फनाकोशी शॉर्टकन कराटे ऑर्गनायझेशन मुलुंड आयोजित कराटे स्पर्धेत १) ऋषिकेश सुतार (७ अ) यास १ सुवर्ण, १ रौप्य, २) सागर चव्हाण (७ अ) यास १ रौप्य तसेच महाराष्ट्र स्टेट ओपन कराटे चॅम्पियनशिप ठाणे, यात सागर चव्हाण दोन रौप्य पदके व रोहन भिसे (७ अ) यास २ सुवर्ण व कांस्य पदक मिळाले.

- २० ऑक्टो. रोजी विद्यालंकार हॉल येथे ६ क च्या विद्यार्थ्यांचा स्काऊट-गाईड शपथ विधी कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास माजी शिक्षक श्री. वैद्य, प्रभारी मुख्या. सौ. कळमकर व प्रभारी उपमुख्याध्यापक सौ. देशपांडे उपस्थित होत्या.

- 'पीतांबरी प्रॉडक्स्' तर्फे 'व्यास क्रिएशन्स' च्या माध्यमातून झालेल्या राज्यस्तरीय निबंध व काव्य लेखन स्पर्धेत ६ वी व ७ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. निकाल अपेक्षित आहे.

- 'ऑल इंडिया कॅमल कलर कॉण्टेस्ट' या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी- आकांक्षा माने(६ वी), प्रणिता काळभोर (५ वी), श्रुतिका महाडे (६ वी), पूजा सावंत (१० वी), भाग्यश्री साळेकर(८ वी), कौस्तुभ बांत्रकर (९ वी).

- २२ ऑक्टोबर रोजी U.K. च्या १० शिक्षकांनी शाळेला सदिच्छा भेट दिली. शिक्षकांनी पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या कार्यपद्धतींची ओळख करून देऊन सिटिझनशिप या विषयावरील माहितीचे सादरीकरण केले. मुख्याध्यापिकांनी शाळेची ओळख, कार्यप्रणाली व शैक्षणिक कार्याचे स्वरूप पाहुण्यांना समजावून सांगितले.

**सौ. आनंदीबाई जोशी, इंग्रजी माध्यम**

- सेंट जोसेफ स्कूल, पनवेल येथे झालेल्या आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धेत, मुंबई संघाला हरवून खालील विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. वृषाली प्रसादे, रूचा अमडेकर, आभा मुतालिक, सानिका ओक, प्रणिता वानावली.

- कु. ऐश्वर्या ओक हिला आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेत मिळालेले यश: माटुंगा येथे झालेल्या आंतरशालेय डी. बी. प्रभू मेमोरियल बास्केट बॉल स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडू म्हणून निवड झाली. आंतरशालेय बास्केटबॉल राज्य चॅम्पियनशिपसाठी मुलींच्या सब-जुनिअर गटात ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व - द्वितीय पारितोषिक चौतिसाव्या सब-जुनिअर मुलींच्या गटाचे पंजाब येथे झालेल्या राष्ट्रीय बास्केटबॉल चॅम्पियनशिपसाठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व - चतुर्थ पारितोषिक.

- निसर्ग मेळा आयोजित ' शेपटी वरून प्राणी ओळखणे' स्पर्धेत इ. ७ वी तील नमिता पंडित हिला रोख पारितोषिक मिळाले.

- राष्ट्रीय शिक्षक विज्ञान परीषदेने आयोजित केलेल्या 'अधिक चांगल्या जीवनासाठी पर्यावरण शिक्षण' ह्या सौ. शर्मिला नायर यांच्या प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. त्यांनी डेहराडून येथे झालेल्या स्पर्धेत प्रकल्प सादर केला.

- श्रीकला संस्था आयोजित नाट्यस्पर्धेत 'बंध नको या सूर धुंदीला' या नाटकाला खालील पारितोषिके मिळाली.

  १) प्रथम क्रमांक (चषक) २) उत्तम गायक, गायिका - अभिलेष गोखले, मधुरा जोशी ३) उत्तम अभिनेत्री - मधुरा जोशी (चशक) ४) उत्तम दिग्दर्शन प्रियांका भांगले (चषक)

- राष्ट्रीय विद्यार्थी विज्ञान परिषदेची तालुका स्तरीय स्पर्धा २ ऑक्टोबर रोजी पार पडली. एकूण ११९ प्रकल्पातून खालील तीस प्रकल्पांची निवड केली गेली. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

  १) जैविक आणि सेंद्रिय खतांमध्ये वाढणाऱ्या झाडांची तुलना - गटप्रमुख - सारंग नेवाळकर २) पानांमधील जैव विविधता - गटप्रमुख - अदित्य अभ्यंकर ३) फुलपाखरांचा जीवनक्रम - गट प्रमुख - आदिती देशपांडे

- मार्गदर्शक शिक्षक - पूर्णिमा साठे, मोना निफाडकर, शर्मिला नायर वरील तीन प्रकल्पांतील 'जैविक आणि सेंद्रिय खतांमध्ये वाढणाऱ्या झाडांची तुलना' या प्रकल्पाची राज्यस्तरासाठी निवड झाली.

- विद्या प्रसारक मंडळ आयोजित जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेत कु. नेहा पुसाळकर हिला द्वितीय क्रमांक आणि कु. अदिती गोखले हिला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

- ४ ऑक्टोबर २००७ रोजी चीनहून परतलेल्या शिक्षक व विद्यार्थ्यांचे अनुभव कथन आणि छायाचित्रांचे प्रदर्शन शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन पालक व विद्यार्थ्यांसाठी खुले होते.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

- दि.६ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर २००७ या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयातर्फे 'Book Keeping and Accuntancy' या विषयासाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता ११ वी व १२ वीच्या सुधारित अभ्यासक्रमाबाबत व प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाबाबत प्रस्तुत कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील अनेक शिक्षकांची या कार्यशाळेसाठी उपस्थिती होती. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांच्या हस्ते झाले. प्रा. पाटील यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. उपशिक्षणाधिकारी श्री. पुरी यांचीही कार्यशाळेत उपस्थिती होती. प्रा. श्री. एस्. पी. विराजदार (मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स), प्रा. श्री. एल्. व्ही. विराजदार (जोंधळे कॉमर्स विद्यामंदिर, डोंबिवली) व प्रा. श्री. व्ही. डी. पाटील (सिध्दार्थ महाविद्यालय) यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेची सांगता 'जोशी-बेडेकर फिल्म सोसायटी' तर्फे दाखविण्यात आलेल्या 'Life is Beautiful' या चित्रपटाने झाली.

- दि. १३ सप्टेंबर रोजी 'NAAC Meeting' आयोजित करण्यात आली होती. वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी आवश्यक माहिती व पूरक कागदपत्रे गोळा करून इतर शिक्षकांसमोर त्याबाबत सादरीकरण केले. एकूण ४१ मुद्द्यांवर प्रस्तुत सभेत चर्चा करण्यात आली.

- दि. १३ सप्टेंबर रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'सावन के गीत' या संकल्पनेवर आधारित संगीत-स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग

यांनी स्पर्धेचे उद्‌घाटन केले. एकूण ६० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला. प्रथम तीन क्रमांकांना पारितोषिके देण्यात आली. याचदिवशी एन. के. टी. महाविद्यालयातर्फे आंतर-महाविद्यालयीन संगीत-स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'सूर-संगम' नामक प्रस्तुत स्पर्धेसाठी कु. रुक्सार सलीम शेख या विद्यार्थिनीने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. ती उपान्त्यपूर्व फेरी पार करून अंतिम फेरीपर्यंत पोहोचली.

❖ दि. १४ सप्टेंबर रोजी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी 'Aesthetic Value of Arts' या विषयावर मौलिक व्याख्यान दिले. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व काही विद्यार्थी यांची प्रस्तुत कार्यक्रमास उपस्थिती होती.

❖ दि. २१ व २२ सप्टेंबर रोजी ग्रंथालय विभागातर्फे नवीन पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. २७०० पुस्तके, २२ परदेशी व १२६ भारतीय मासिके या वर्षी विकत घेण्यात आली.

❖ दि. २१ सप्टेंबर रोजी स्कॉलर्स ॲकॅडमीतर्फे 'Journalism and Mass Media: Present Scenario या विषयावर लोकसत्ताचे ज्येष्ठ पत्रकार श्री. रवींद्र मांजरेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

❖ दि. २४ सप्टेंबर रोजी 'N.S.S दिन' साजरा करण्यात आला. हा दिवस UNISEF तर्फे 'कन्या दिन' म्हणूनही साजरा करण्यात येतो. महाविद्यालयाच्या 'Women's Development Cell' तर्फे व 'Student's Council' च्या विद्यार्थ्यांतर्फे 'Save a Firl Child' या संकल्पनेवर आधारित एका उद्बोधन -फेरीचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी या प्रसंगी कोणत्याही गर्भनिदान चाचणीस सामोरे न जाण्याची विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञा घेतली.

❖ दि. २६ सप्टेंबर रोजी इंग्रजी वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन प्रा. श्री. अरविंद मर्डेकर यांच्या हस्ते झाले. त्यांनी ' Impact of Globalization on Art and Literature' या विषयावर आधारित प्रा. वारसे, प्रा. ढवळे व प्रा. शिंदे यांची व्याख्याने कात्यायन सभागृहात झाली. या प्रसंगी 'Children of Heaven' हा चित्रपट दाखवण्यात आला.

दि. १ ऑक्टोबर रोजी कात्यायन सभागृहात 'शोधनिबंध-सादीकरण' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे, अधिव्याख्यात्री, राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ व डॉ. मीनल कातर्णीकर, अधिव्याख्यात्री, तत्त्वज्ञान विभाग, यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

☆ मुंबई विद्यापीठाच्या ४० व्या युवक महोत्सवांतर्गत आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांची निवड फेरी बांदोडकर व जोशी बेडेकर महाविद्यालयात घेण्यात आली. या सांस्कृतिक महोत्सवात नृत्य, गायन, एकांकिका, पथनाट्य आदी विविध स्पर्धांचा समावेश होता. विज्ञान महाविद्यालयाची कु. विनंती म्हात्रे ही एकपात्री अभिनय स्पर्धेत प्रथम आली.

☆ महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे एम. लिब. चे वर्ग घेण्यात येतात. २००७ वर्षातील एम. लिब. निकाल ७३.५२% आहे. श्री. वैभव प्रफुल्ल पंडित हे ६६.३७% गुण मिळवून अभ्यासकेंद्रात प्रथम आले.

* रसायनशास्त्र विभागाच्या उर्जा या क्लबचे उद्घाटन शनिवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी श्री. एम. जी. गद्रे यांच्या हस्ते झाले. श्री. व्ही. आर भाटे यांनी रसायनशास्त्राचे विविध क्षेत्रातील महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. श्रीमती माधुरी पेजावर यांनी विद्यार्थ्यांना अशा क्लबचे महत्व पटवून दिले.

* गणित विभागाच्या 'सिद्धांत' क्लबचे उद्‌घाटन शनिवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी श्री. वाघोडे, निवृत्त उपसंचालक शिक्षण विभाग यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना बी. एस. सी. नंतरच्या व्यवसाय संधीची माहिती करून दिली. कार्यक्रमाला उपप्राचार्या श्रीमती अकोलकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रथम,द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचीही उपस्थिती होती.

* 'महात्मा गांधी आणि स्वातंत्र्य चळवळ' या विषयावर दिनांक १२ सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता महाविद्यालयामध्ये एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राला विद्यार्थी आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

**रसायनशास्त्र कार्यशाळा अहवाल**

* रसायनशास्त्र विभागातर्फे दिनांक ०६ ऑक्टोबर २००७ रोजी <u>कंटॅमिनंटस इन फूड बेवरेजेस</u> या विषयावर एक परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेला मुंबई विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. अरुण सावंत, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर उपप्राचार्या श्रीमती मीरा अकोलकर, रसायनशास्त्र विभागप्रमुख श्री.स. म. मेटेकर, परिषदेचे सचिव प्रा. विनायक बुरकुले उपस्थित होते.

डॉ. सावंत यांनी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. ते अ म्हणाले की कंटॅमिनंटस (दूषिते) त्यांच्याविषयी असलेल्या आपल्या अपुऱ्या ज्ञानामुळे आपल्या शरीरात प्रवेश करतात. अन्नसाखळीद्वारे झालेले कंटॅमिनेशन हे अत्यंत घातक ठरू शकते. ते पुढे असेही म्हणाले की कंटॅमिनंटसबद्दल समाजामध्ये जागरूकता निर्माण होण्याकरता विविध हेल्थ केअर प्रोग्राम आयोजित केले गेले पाहिजेत.

डॉ. रंजन शास्त्री यांनी कंटॅमिनंटस इन फूड अँड बेवरेजेस या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. आर. एस. लोखंडे, प्राध्यापक रसायनशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ यांनी हेवी मेटल अँन्ड रेडिओॲक्टिव्ह कंटॅमिनंटस इन फूड या विषयावर माहिती दिली. श्री. एच. डी. साळुंखे जॉइंट कमिशनर कोकण डिवीजन फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन यांनी रोल ऑफ एफडीए इन फूड ॲडल्टरेशन यावर चर्चा केली. श्री. आर. पी. चव्हाण (ज्ञानसाधना महाविद्यालय) यांनी ऑरगॅनिक कंटॅमिनंटस इन ठाणे क्रीक वॉटर अँण्ड देअर कॉन्स्ट्रेशन यावर सादरीकरण केले. डॉ. मोजेस कोलेट यांनी मायटोटॉक्सिनबद्दल माहिती दिली.

रसायनशास्त्राच्या पुढील विद्यार्थ्यांनीदेखील सादरीकरण केले.

| विद्यार्थ्यांचे नाव | सादरीकरणाचा विषय |
|---|---|
| १) रघुनाथ सखा | कंटॅमिनंटस इन मीट |
| २) पूजा दांडेकर | कंटॅमिनंटस इन ऑइल |
| ३) सौद देशमुख | हेवी मेटल कंटॅमिनंटस इन व्हेजीटेबल्स |
| ४) सोनल साळवी | कंटॅमिनंटस इन बेवरेजेस |

प्रा. विनायक बुरकुले यांनी आभार प्रदर्शन केले. श्रीमती सिंधु तावडे यांनी पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता केली.

## कनिष्ठ महाविद्यालय अहवाल

महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयांतर्फे दिनांक १० व ११ सप्टेंबर २००५ रोजी Enviroment Education Projects & Bioinformatics या विषयावर थोरले बाजीराव पेशवे सभागृहात दोन दिवसांची कार्यशाळा घेण्यात आली.

अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात पर्यावरण शिक्षण या नवीन विषयाचा समावेश करण्यात आला आहे. हा विषय बारावीच्या अभ्यासक्रमात समाविष्ट केला आहे. कार्य शाळेला पर्यावरण क्षेत्रातील अनुभवी डॉ. शशिकुमार मेनन हे तज्ज्ञ म्हणून लाभले होते. तसेच श्री आनंद पेडणेकर हेदेखील उपस्थित होते. ठाणे आणि कल्याण मधील विविध महाविद्यालयातील ४२ शिक्षकांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता.

डॉ. गोल्डीन क्वाड्रोज हे (WWF) या संस्थेत शिक्षण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच ते 'पांडा' बुलेटिन आणि निर्सग वार्ता यांचे संपादक आहेत. त्यांनी एज्युकेशन इन सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर भाषण केले.

डॉ. शशिकुमार मेनन यांनी प्रकल्पांची आवश्यकता घटक, हेतू , शाळा व महाविद्यालयातील त्यांची भूमिका लिखाण, प्रकल्पाचे मूल्यमापन यावर विस्तृतपणे भाषण केले.

कार्य शाळेच्या दुसऱ्या दिवशी डॉ. किरण पारिया यांनी Bioinformatics यावर सत्र घेतले. श्रीमती क्लारा सेंट जॉन बापटिस्ट हाय स्कूल व ज्यूनियर कॉलेज यांनी छोट्या कॉलेजेसना अशा कार्यशाळेची आवश्यकता आहे हे सांगितले.

हरियालीचे अध्यक्ष प्रा. पूनम सिंघवी या समारोप प्रसंगी अध्यक्ष म्हणून लाभले. या कार्यशाळेतील उपस्थित सर्व शिक्षकांना प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात आली.

## भौतिकशास्त्र कनिष्ठ महाविद्यालय कार्यशाळा

मुंबई विभागाच्या शिक्षण अधिकारी शाखेने भौतिकशास्त्र विषयासाठी हे महाविद्यालय निवडले. जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना हे प्रशिक्षण उपलब्ध करून दिले.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. जिल्ह्याचे शिक्षण अधिकारी श्री. पुरी व बोर्ड ऑफ स्टडिज् पुणे चे सभासद श्रीयुत पी. डब्ल्यू. भोमे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

दुसऱ्या दिवशी अंधेरी येथील भवन्स महाविद्यालयाचे प्रा. भांडारकर यांनी प्रश्नपत्रिकेच्या नमुन्याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. प्रा. अत्तरदे यांनी प्रश्नपत्रिकेचे ब्लू प्रिंट कसे काढतात याचे प्रात्यक्षिक दाखविले. ब्लू प्रिंट बनविताना कोणते निकष लावले जातात याची सविस्तर मांडणी केली.

शेवटच्या दिवशी महाविद्यालयाचे डॉ. न्यायाते यांनी डी. ब्राग्ली हायपोथिसिस वेव्हलेन्थ ऑफ अॅन इलेक्ट्रॉन एमिशन जर्मर एक्सपरिमेंट या नवीन विषयावर विस्तृतपणे भाषण केले.

समारोपाच्या दिवशी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा आढावा घेतला आणि महाविद्यालयातील शिक्षक सर्वांना नेहमीच मदत करतील याचे आश्वासन दिले. या कार्यशाळेतील उपस्थित सर्व शिक्षकांना प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात आली.

## तंत्रनिकेतन

### शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन.

मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या इलेक्ट्रिकल व

इन्स्ट्रूमेंटेशन शाखेतर्फे शिक्षक व लॅब सहाय्यक यांच्यासाठी दोन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांचे उद्घाटन MEDCL चे कार्यकारी संचालक श्री. सोनावणे यांच्या हस्ते दि.२४.०९.२००७ रोजी करण्यात आले. दि.२४ ते २८ सप्टेंबर २००७ या कालावधीत झालेल्या या कार्यशाळांमध्ये महाराष्ट्रातील विविध तंत्रनिकेतनातील सुमारे चाळीस शिक्षक व लॅब Assistants सहभागी झाले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी तंत्रनिकेतनशाळा आयोजित करण्यामागचे उद्दिष्ट व महत्त्व स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्फे सुधारित अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. या अभ्यासक्रमातील 'Energy Managemant, Energy Audit, PLC,SCADA या सारख्या विषयातील शिक्षकांचे व practical घेणाऱ्या लॅब सहाय्यक यांचे ज्ञान वृद्धींगत व्हावे व त्यांचा फायदा विद्यार्थ्यांनाही व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या तंत्रनिकेतनाने या दोन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यशाळेप्रसंगी - वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक (मध्यभागी बसलेले) विशक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक

## विधी महाविद्यालय

**मानसिक आरोग्य कायदा 1987 - माहिती व प्रसार चर्चासत्र- वृत्तांत**




मानसिक आरोग्य कायदा १९८७- माहिती व प्रसार चर्चासत्र - वृत्तांत

दि. १६ ऑक्टो. रोजी मंडळाच्या विधी महाविद्यालयात ठाणे जिल्हा कायदा १९८७ - माहिती व प्रसार या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास ठाणे जिल्हा न्यायाधीश क्र. ४ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री. सांगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्वागतपर भाषणात त्यांनी मानसिक आरोग्याकडे अजूनही तेवढ्या गांभीर्याने पाहिले जात नसल्याबद्दल खंत व्यक्त केली.

मानसिक दुर्बल घटकांच्या घरातही तितक्या सहानुभूतीने बघितले जात नाही. त्यांना इस्पितळात दाखल करण्याऐवजी दडपून टाकण्याचाच जास्त प्रयत्न होतो. त्यामुळे कदाचित त्यांच्या स्वतःच्या किंवा इतरांच्या जिवितासदेखील धोका उत्पन्न होऊ शकतो या आशयाची एकांकिका महाविद्यालयातील तृतीय वर्षाचे विद्यार्थी श्री. सुयोग यांनी सादर केली.

चर्चासत्रात महाविद्यालयातील प्रा. प्रज्ञा राजेबहादूर यांनी मानसिक आरोग्य कायद्याअंतर्गत असणारे अधिकारी आणि मानसिक रुग्णांच्या इस्पितळासाठी परवानगीच्या तरतुदी यावर आपले विचार मांडले.

प्रभारी प्राचार्य सौ. श्रीविद्या जयकुमार यांनी या कायद्यातील मानसिक रुग्णांना इस्पितळात दाखल करताना व सोडताना कोणत्या बाबींकडे लक्ष द्यायला हवे. तसेच मानसिक रुग्णांना मानवी हक्कांचे संरक्षण कसे मिळते व अधिक चांगल्या प्रकारे ते कसे मिळायला हवे याचे विश्लेषण केले.

प्रा. जान्हवी नवरे यांनी मानसिक रुग्णांच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनासंदर्भातील कायद्याच्या तरतुदींवर भाष्य केले.

'सेहत' या सामाजिक संस्थेच्या प्रतिनिधी सौ. पिंकी यांनी मानसिक आरोग्य क्षेत्रातील सामाजिक संस्थांचा सहभाग यावर आपले मत मांडले. चर्चासत्राच्या शेवटी प्रा. सुनील परांजपे यांनी या क्षेत्रात नव्याने प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांना या रुग्णांना मदत करताना कोणत्याही प्रकारचा व्यावसायिक मोबदला न घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेत विद्यार्थी परिषदेचा सक्रिय सहभाग होता.


\- संकलित

दिशा

**प्रकाशनास होत असलेल्या विलंबामुळे आम्ही दिलगीर आहोत.**

\- संपादक

## एक झाड



१) एक पूर्ण वाढलेले झाड आपल्याला कमीत कमी सहा लाख रुपयांचा ऑक्सिजन देतं.

२) तेच झाड आपल्या राष्ट्राच्या आर्थिक संपत्तीत तीन ते पस्तीस लाखांची भर टाकतं.

३) एक मोठ्या झाडाच्या आश्रयाला दीडशेहून अधिक सजीव येत असतात.

४) लहान-मोठे कीटक, पक्षी, मुंग्या, जनावरं कितीतरी अवलंबून असतात त्यावर! याची किंमत अडीच लाखांहून अधिक.

५) एक झाड जमिनीची धूप थांबविण्यात, पोत सुधारण्यात अडीच लाखांहून अधिक किमतीची मदत करतं.

६) तेच झाड पाण्याची आर्द्रता टिकवण्यात, नैसर्गिक संतुलन साधण्यात महत्वाचं काम करते.

७) एका झाडापासून सरपण, मध, फळं वगैरे असे दोन लाखांहून अधिक रकमेचे फायदे होऊ शकतात.

८) तेच झाड २०,००० रुपयांच्या प्रथिनांच उत्पादन करते.

९) त्यासाठी किमान एक तरी झाड लावावं...व ते पूर्ण वाढू द्यावं.

(मुखपृष्ठा वरून)

संपादकीय

'' ... आता काय परिस्थिती आहे?''

समाजातील बहुसंख्येने असणाऱ्या या सामान्य माणसाला काय हवे असते? किमान सुख आणि सुरक्षितेची भावना, सुखाच्या या शोधात ही माणसे रात्र न् दिवस घाम गाळतात. पण सुख, आनंद याच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगळ्या असतात. व्यक्तिसापेक्ष असतात. त्यामुळे जो तो आपल्यापुरत्या सुखासाठी जीवाचे रान करतो. सुख समोर आले आहे, आता काय आपल्यात व सुखात थोडेसच अंतर राहिले आहे असे वाटत असतानाच विपरीत घडते आणि भली माणसे अचानक हिंस्र होतात. त्यांच्या अशांततेत, अस्वस्थ्यात असुरक्षितेची टोकाची भावना निर्माण करणाऱ्या वाहिन्या असतातच. वाहिन्यांच्या या विकृत प्रसारण संस्कृतीमुळे कित्येक सामान्य माणसांचे सुखाचे क्षण कायमच संपलेले असतात. ओठाशी नेलेला सुखाचा घास हिरावून घेतला जातो आणि नियती किंवा नशीब म्हणतात, तो अनाकलनीय भाग सामान्य माणसाला झुलवत ठेवतो. पुन्हा प्रतीक्षा, पुन्हा कष्ट आणि पुन्हा सुखाची स्वप्नं .

या अवस्थेला इतर वाहिन्या कारणीभूत नसतात का? असतात. पण त्या दाखवतात ते खरे नाही, अशी माणसाची अंतर्मनात समजुत असते. बातम्यांच्या वाहिन्यांवरून दाखवले जाते, पेपरमध्ये 'छापून' येते ते सर्व खरे या समजुतीचा जबरदस्त प्रभाव आमच्या मनांवर असतो. त्यामुळे बातम्या घडवून आणण्याचा धंदा घातक ठरायला लागलेला आपल्याला दिसतोय. याचे एक उदाहरण म्हणजे मुंबई शहरातील अनेक भागात पाणी भरले आहे अशी समजुत करून देणारी 'फाईल चित्रे'. फाईल चित्र किंवा संग्रहीत दृश्य असे न म्हणता बारंवार पावसाळ्यात दाखवली गेली तर मुंबई व परिसरातल्या दर्शकांत अस्वस्थता निर्माण होते. नातेवाईकांना मोबाईल लावले जातात. परिस्थिती विषयक निर्माण झालेल्या भीतीतून हे सर्व घडते. असुरक्षित वाटायला लागते. व मोबाईल लागला नाही तर मनावर वाढणारा ताण असह्य होते.

यांतून अफवा पसरणे, अपघात होणे, घातपात होणे या शक्यता वाढतात. 'आता काय परिस्थिती आहे...?' या प्रश्नातून अनामिक ताण वाढतात. या २४ तास बातम्यांची इतकी गरज खरेच आहे काय? या वृत्तवाहिन्यांमधून बातम्या घडवणे, दाखवणे या संदर्भात होणारा व्यापार हा तर स्वतंत्रच विषय आहे. आपण यातून काय मिळवतो आहोत, हा प्रश्न आपणच आपल्याला विचारला हवा!

या पद्धतिच्या जीवनशैलीमुळे जीवनातील स्वास्थ्य संपत आहे. जगताना कायम भीतीची टांगती तलवार, असुरक्षितपणाची भावना कोणत्याही क्षणी काही तरी उद्ध्वस्त करणारे घडणार आहे याची धास्ती. या सर्वांतून 'पॅनिक' म्हणतात अशा अवस्थेत माणस जगतात! आणखी माणसं मेलेली असण्याची शक्यता आहे. असे सांगणाऱ्या वाहिन्या पण माणसे मरण्याची वाट पाहणारा काळच वाटतात. या वाहिन्यांची असंस्कृत भाषा हा तर मन विदीर्ण करणारा अनुभव असतो. जीवनाचे मोल मातीमोल करणारी ही संस्कृती आपण जगतो आहोत. पवित्र, मांगल्य, खरे हे शब्द यापुढे इतिहासजमा होतील!

•••